




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २४६ ■ सोमवार, दि. १६ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## एअर इंडियाच्या 4 हजार कर्मचाऱ्यांवर कारवाई !

**नवी दिल्ली :** एअर इंडिया या विमान कंपनीने नियोजित रजा प्रवास धोरणाचा (ईएलटी) गैरवापर करणाऱ्या तब्बल ४ हजार कर्मचाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. या कर्मचाऱ्यांकडून दंड आकारण्यासह सुधारणात्मक कारवाई सुरू केल्याचा दावा रविवारी सूत्रांकडून करण्यात आला. टाटा समूहाने जानेवारी २०२२ मध्ये तोट्यात चालणारी एअर इंडिया विकत घेतली. या विमान कंपनीकडून सध्या एक महत्त्वाकांक्षी परिवर्तन योजना राबवण्यात येणार आहे. एअर इंडियामध्ये एकूण २४ हजारांहून अधिक कर्मचारी आहेत.

# घरगुती, व्यावसायिक सिलिंडरचा तुटवडा

## हॉटेलचालक आक्रमक विद्यार्थ्यांच्या ताटात अन्नाऐवजी चिंता !



व्यावसायिक गॅस मिळत नसल्याने मेस आणि भोजनालयांचे चक्र विस्कळीत. शिक्षणासाठी शहरात आलेल्या हजारो विद्यार्थ्यांच्या रोजच्या जेवणावर टांगती तलवार आहे. भोजनालयात अन्न शिजविण्यासाठी गॅस ऐवजी शेगडीचा वापर करावा लागत आहे. त्या कोळसा, लाकूड टाकून त्याला ब्लोअरने वारा द्यावा लागत आहे.



व्यावसायिक सिलिंडर कपातीविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकवटलेले हॉटेल, रेस्टॉरंट आणि कॅटरर्स असोसिएशनचे पदाधिकारी. हक्काच्या गॅससाठी व्यावसायिकांचा एल्गार पुकारला आहे.

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला :** शहरात सध्या 'गॅस'चा मोठा स्फोट होताना दिसत आहे, पण हा स्फोट सिलिंडरचा नसून जनतेच्या संतापाचा आहे! व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या तीव्र टंचाईमुळे अकोल्याची अर्थव्यवस्था आणि विद्यार्थ्यांची भूक दोन्ही संकटात सापडली आहेत. सोमवारी १६ मार्च रोजी अकोल्यातील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स आणि खाद्य विक्रेत्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत प्रशासनाला जाब विचारला. व्यावसायिक सिलिंडरमध्ये केल्या जाणाऱ्या कपातीमुळे मेस आणि चौपाटीवरील व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत. दुसरीकडे, गॅस एजन्सींनी चक्क 'शटर डाऊन' करून निवडक ग्राहकांनाच प्रवेश देण्याचे धोरण अवलंबल्याने ग्राहकांमध्ये तीव्र संताप आहे. ऑनलाईन बुकिंग बंद असल्याने सामान्य नागरिक उन्हात एजन्सीच्या पायऱ्या झिजवत आहेत. विशेषतः शिक्षणाचे माहेरघर असलेल्या अकोल्यात हजारो विद्यार्थ्यांच्या भोजनाचा प्रश्न गंभीर झाला असून, व्यावसायिक गॅसअभावी भोजनालये बंद पडण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास अकोल्यात मोठा जनक्षोभ उसळण्याची शक्यता आहे.






## गॅस सिलेंडरचा जिल्ह्यात तुटवडा नाही – खा. धोत्रे

**बाळापूर:** अकोला जिल्ह्यात गॅस सिलेंडर चा तुटवडा असल्याच्या अफवा विरोधक जाणूनबुजून पसरवत असून त्याच्या अफवावर सर्वसामान्य लोकांनी विश्वास ठेवू नये तसेच जिथे कुठं गॅस चा तुटवडा आहे असे गॅस एजन्सी धारक सांगत असतील तर थेट माझ्याशी संपर्क करावा असे आवाहन आज खा अनुप धोत्रे यांनी केले. ते बाळापूर येथे दीनदयाल उपाध्याय कार्यकर्ता प्रशिक्षण महाअभियान कार्यक्रम प्रसंगी उत्सव मंगल कार्यालय बाळापूर येथे आज बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की केंद्र आणि राज्य सरकार अनेक लोकांभिमुख योजना राबवित आहे त्यामुळे विरोधकांकडे आता कोणतेच मुद्दे शिल्लक राहिलेले नाहीत त्यामुळे सरकारची बदनामी करण्यासाठी काहीतरी मुद्दे उकरून काढत आहे गॅस सिलेंडर टंचाई हा त्यातीलच एक मुद्दा आहे अकोला जिल्ह्यात पुरेसा गॅस सिलेंडर चा साठा उपलब्ध असून कुठेही टंचाई नाही आणि जर गॅस एजन्सी धारक कुठे टंचाई आहे असं सांगत असतील तर थेट माझ्याशी संपर्क करा असे आवाहन उपस्थित भाजपा कार्यकर्त्यांना केले तसेच सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या आरोग्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटीबध आहोत.

# अमरावतीच्या भीषण अपघातात बाप-लेकीचा जागीच मृत्यू!

प्रतिनिधी १६ मार्च

**अमरावती :** शहराच्या राजापेठ पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या एमआयडीसी चौकात रविवारी मध्यरात्री काळाने घाला घातला. भरधाव वेगाने येणाऱ्या एका कारने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात गजानन श्रीरामजी माकोडे (५२) आणि त्यांची कन्या सपना गजानन माकोडे (२४) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्यांची दुसरी मुलगी प्रियंका ही गंभीर जखमी असून तिची प्रकृती चिंताजनक आहे. अपघात झाल्यानंतर कारचालकाने पळ काढला, मात्र सोमवारी पहाटे त्याने स्वतःहून राजापेठ पोलीस



स्टेशन गाठून आत्मसमर्पण केले. हिट अँड रनच्या या घटनेने अमरावतीत मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तिवसा येथील रहिवासी मुकेश रामचंद्र रावकर हे त्यांच्या साडूच्या म्हणजे गजानन माकोडे यांच्या घरी मायानगर येथे आले होते. सपना माकोडे हिला पुण्याला जाण्यासाठी रात्री १२.१०ची ट्रॅव्हल्स होती. तिला बसवर सोडण्यासाठी गजानन माकोडे हे त्यांच्या दोन्ही मुलींना सपना (२४) आणि प्रियंका (२२) यांना घेऊन स्वतःच्या काळ्या रंगाच्या दुचाकीने एमआयडीसी चौकात पोहोचले. १६ मार्च रोजी रात्री १२.०५च्या सुमारास, नांदगाव पेठकडून बडनेराच्या दिशेने सुसाट वेगाने येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या कारने त्यांच्या दुचाकीला भीषण धडक दिली. अपघातानंतर पोलिसांनी जखमींना तातडीने इर्विन रुग्णालयात हलवले. मात्र, डॉक्टरांनी तपासून गजानन माकोडे आणि त्यांची मोठी मुलगी सपना यांना मृत घोषित केले.

# पिकअप व्हॅन चा भीषण अपघात

प्रतिनिधी १६ मार्च

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील वरुड रेल्वे क्रॉसिंग जवळ पिकअप व्हॅन पलटी झाल्याने २७ मजूर जखमी झाले असून त्यामध्ये १९ जणांची परिस्थिती गंभीर असल्याने त्यांना नागपूर येथे उपचारासाठी रवाना करण्यात आले हे मजूर संत्र्याची तोड करण्यासाठी नजीकच्या इसम्ब्री बायदा या गावा कड़े पिकअप व्हॅन मध्ये बसून जात होते सकाळी दहा वाजता हा अपघात



झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच वरुड पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते या अपघातामुळे घटनास्थळी वेदनेने तडफडत असलेल्या या जखमींना पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने नागपूर वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी रवाना केले. या अपघातामुळे क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवून सुसाट वेगाने धावणाऱ्या अवैध वाहतुकीचा प्रश्न समोर आला आहे. याप्रकरणी वरुड पोलीस पुढील तपास करीत आहेत


## CLASSIFIED

### प्लॉट प्लॉट प्लॉट

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649

### फ्लॅट फ्लॅट फ्लॅट

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

### सेल्समॅन पाहिजे

सन ऑप्टिकल मध्ये ई कॉमर्स ऑपरेटर ऑप्टिकल सेल्समॅन पाहिजे
- भेटण्याची वेळ दुपारी १२ ते ५
- संपर्क -
मो. 8888867287

### भाड्याने देणे आहे

महिला व मुलीसाठी एक रुम बाथरुम संडास अटॅच एक दुकान १० बाय १० रोड टच भाड्याने देणे आहे.
- पत्ता -
जवाहर गेट, परकोटच्या आत साबनपुरा, अमरावती.
9403005251




शासकीय वसतिगृहात निकृष्ट जेवण मिळत असल्याने विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. त्यांनी आज निमवाडी येथील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयासमोर याविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली.

# सेजल' मिसाईल इस्त्रायलवर डागली !

## 2500 किमी टार्गेटची क्षमता दुबई एअरपोर्टवर पुन्हा ड्रोन हल्ला



**नवी दिल्ली:** अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धाचा १७वा दिवस आहे. युद्ध लांबत चालल्याने इस्त्रायल आणि अमेरिकेची दमछाक झालेली दिसून येत असतानाच आता या संघर्षात इराणने पहिल्यांदाच इस्त्रायलवर सेजिल बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागली आहेत. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने सांगितले की इस्त्रायली लष्करी आणि संरक्षण सुविधांना लक्ष्य करण्यात आले. हे २०००-२५०० किमीच्या पल्ल्याचे घन इंधनयुक्त सामरिक क्षेपणास्त्र आहे. दुसरीकडे, दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरही स्फोट झाला असून दृश्य कॅमेऱ्यात कैद झाली आहेत.

दरम्यान, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी काल सांगितले की इराणने युद्धबंदी मागितली नाही किंवा अमेरिकेशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न केला नाही.

# पावसाचा 'यलो अलर्ट', १७-२० मार्च मुसळधार पावसाची शक्यता!

प्रतिनिधी १६ मार्च

**मुंबई :** राज्यात गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे कडाकाच्या उन्हापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून राज्यात उष्णतेच्या लाटांमुळे घराबाहेर पडणे कठीण झाले होते. पण गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात होणाऱ्या पावसामुळे तापमानात घट झाली आहे. सोमवारीही हवामान विभागाकडून काही भागांना यलो अलर्ट देण्यात आला असून, येत्या दोन-तीन दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. सोमवारी मध्य महाराष्ट्रासह विदर्भात पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली गेली आहे. दरम्यान, १७ मार्च ते २० मार्च दरम्यान महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. यामुळे शनिवार आणि रविवारी राज्यात कोल्हापूर जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. सोमवारी विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, १७-१८ मार्चपासून या भागांत पाऊस पडायला सुरुवात होणार असून, १९ ते २० मार्चपर्यंत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

## बारामती, राहुरी विधानसभा पोटनिवडणूकही जाहीर

प्रतिनिधी १६ मार्च

**मुंबई :** निवडणूक आयोगाने रविवारी राज्यातील बारामती व राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक जाहीर केली. या दोन्ही विधानसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. ३० मार्चला अधिसूचना जारी केली जाणार आहे.अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झाल्याने बारामती विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली होती. तर राहुरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार शिवाजी कर्डिले यांचे गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात निधन झाले होते.

# विदर्भस्तरीय मूकबधिर क्रिकेटचा थरार

## २६ एप्रिलला शास्त्री स्टेडियमवर आयोजन



प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला:** विदर्भातील मूकबधिर क्रिकेटपटूंना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्यातील क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी अकोला शहरात 'पहिली विदर्भस्तरीय मूकबधिर क्रिकेट स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. 'विदर्भ मूकबधिर क्रिकेट असोसिएशन, अकोला' यांच्या वतीने २६ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक शास्त्री स्टेडियमवर हा रोमांचक सामना रंगणार आहे.

मूकबधिर खेळाडूंमध्ये आत्मविश्वास वाढवणे, त्यांच्यात एकता निर्माण करणे आणि खेळाच्या माध्यमातून आनंदी वातावरण निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य हेतू आहे. विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून टॅलेंटेड मूकबधिर खेळाडू या स्पर्धेत आपला खेळ दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुमारे ९०,५००/- रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यामध्ये खेळाडूंचा अल्पोपहार, किट (टी-शर्ट, पँट, कॅप्स), क्रिकेट साहित्य आणि ट्रॉफीचा समावेश आहे. या उदात्त कार्यासाठी दानशूर व्यक्ती आणि संस्थांनी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून दिव्यांग खेळाडूंच्या स्वप्नांना नवी उभारी मिळणार असून, अकोलेकर क्रीडाप्रेमींनी या सामन्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा, अशी विनंती असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

# आता पोलिस संरक्षणात होणार गॅस पुरवठ्याचे वितरण !

## राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय; गॅस एजन्सी, सिलेंडरच्या गाड्यांना संरक्षणाचे आदेश

प्रतिनिधी १६ मार्च

**मुंबई :** इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका यांच्यात सुरु असलेल्या युद्धामुळे सध्या जगभरात इंधन टंचाईचे संकट उभे राहिले आहे. भारतात विशेषत: गॅसचा तुटवडा जाणवताना दिसत आहे. गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या रांगा लागत आहेत. त्यातच केवायसीची नवीन अडचण येत असल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. त्यामुळे वादाचे प्रसंग घडत असल्याने आता गॅस एजन्सी व सिलिंडरच्या गाड्यांना पोलिस संरक्षणे देण्यात यावे, असे आदेश



चिंतेचे वातावरण असून हे नागरिक गॅस एजन्सीबाहेर रांगा लावताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गॅस वितरकांना पोलीस संरक्षण द्या, असा आदेश अन्नपुरवठा विभागाकडून जिल्हा प्रशासनाला देण्यात आला आहे. गॅस वितरकांवर काही ठिकाणी हल्ले होत असल्याने त्यांच्यासह वितरण कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याच्या सूचना अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून देण्यात आल्या आहेत. गॅस सिलेंडरची वाहतूक करणाऱ्या वाहनासह गॅस एजन्सीलादेखील संरक्षण देण्याचा आदेश देण्यात आला आहे. अन्न व पुरवठा विभागाने यासंदर्भात एक परिपत्रक काढले असून गॅसस्थिती पूर्वस्थितीवर येत नाही तोपर्यंत हे धोरण लागू असेल, असे स्पष्ट केले आहे. पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी जिल्हास्तरावर समिती स्थापन करण्याचा आदेश देण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येत असून त्यात पोलीस अधीक्षक पोलीस आयुक्त सदस्य सचिव असणार आहेत.

### मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाकडे कानाडोळा!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वारंवार राज्यात कोणतीही गॅस टंचाई नसल्याचे सांगत आहेत. लोकांना घरगुती गॅस सिलेंडर योग्यवेळी मिळतील. त्यासाठी गॅस एजन्सीबाहेर रांगा लावू नका, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला नागरिकांनी नाकारल्याचे दिसत आहे. सोमवारी सकाळपासूनच एलपीजी सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांनी मोठी रांग लावल्याचे दिसून आले. घरगुती गॅस सिलेंडर खरेदी करण्यासाठी नागरिकांनी सकाळीच रांग लावली आहे.

सिटी न्यूज अमरावती

सोमवार, दि. १६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महा अभियान

**अमरावती :** १५ मार्च रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत तालुका स्तरीय कार्यशाळा स्व. श्यामाप्रसाद मुखर्जी सभागृह, वरुड येथे उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेस अमरावती जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी व सदस्य, प्रदेश पदाधिकारी, संपूर्ण मंडळ कार्यकारिणी, मोर्चा/आघाडी/सेलचे अध्यक्ष व सरचिटणीस, शक्ती केंद्र प्रमुख व बूथ प्रमुख उपस्थित होते. तसेच वरुड व शेंदुर्जनाघाटचे नगराध्यक्ष, नगरसेवक-नगरसेविका यांच्यासह वरुड शहर मंडल, शेंदुर्जनाघाट शहर मंडल, वरुड ग्रामीण मंडल व लोणी बेनोडा मंडल येथील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला आमदार उमेश यावलकर , व भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांनीही मार्गदर्शन केले.

# गॅस सिलेंडर दरवाढी विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेसचे जोरदार आंदोलन

प्रतिनिधी १६ मार्च

## जिल्हाधिकारी यांना दरवाढ कमी करण्यासंदर्भात दिले निवेदन




**अमरावती:** शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र सरकारच्या घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडर दरवाढी विरोधात आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेनुसार आयोजित करण्यात आले होते.केंद्र सरकारने अलीकडेच घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किंमतीत ६० रुपये आणि व्यावसायिक सिलेंडरच्या किंमतीत ११५ रुपये इतकी वाढ केली आहे. ही दरवाढ पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा किंमतींमध्ये झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर झाली असून, यामुळे सर्वसामान्य जनतेला विशेषतः महिलांना आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.या अन्यायकारक निर्णयाला विरोध करण्यासाठी राज्यभर काँग्रेसने आंदोलनाची हाक दिली असून, अमरावती मध्येही शहर काँग्रेस कमिटीने यात सक्रिय सहभाग घेतला.आंदोलनाचे नेतृत्व अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष .बबलु शेखावत,माजी महापौर तथा विरोधीपक्ष नेता मनपा विलास इंगोले,आणि महिला काँग्रेस अध्यक्षा सौ.जयश्री वानखडे यांनी केले तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी महापौर मिलिंद चिमोटे,नगरसेवक अनिल अग्रवाल हे उपस्थित होते.आंदोलकांनी ‘गॅस सिलेंडर दरवाढ रद्द करा’, ‘लाडक्या बहिणींना लुटणाऱ्या मोदी सरकारचा निषेध असो’, ‘नरेंद्र झाले सरेंडर’, ‘महागाईचा झटका लाडक्या बहिणींना फटका’, ‘देशद्रोही मोदी सरकारचा निषेध असो’ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विशेष आकर्षक पद्धतीने विरोध व्यक्त केला. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच चूल पेटवून स्वयंपाक केला आणि मोदी सरकारच्या महागाई धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त केला.ही चूल पेटवण्याची घटना सर्वसामान्य गृहिणींच्या दैनंदिन संघर्षाचे प्रतीक ठरली.आंदोलनानंतर अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने मा. आर.डी.सी.साहेब जिल्हाधिकारी कार्यालय यांना निवेदन सादर करण्यात आले.

# संसद भवनाची मर्यादा भंग केल्याचा निषेध

प्रतिनिधी १६ मार्च

## राहुल गांधी विरोधात भाजपचे निदर्शने

**खामगाव :** भारताच्या संसद भवन मधील मकरव्दार जवळ बसून चहा-कॉफी घेत पिकनीक करत संसद भवनाच्या मर्यादेचा भंग केल्याच्या कारणावरून संपूर्ण देशात भारतीय जनता पार्टीकडून काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात निषेध आंदोलन करण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर खामगाव येथेही १५ मार्च रोजी भाजपाकडून येथील टॉवर चौकातील भाजप कार्यालयासमोर भाजपाचे महाराष्ट्र मिडीया सेलचे संयोजक सागर फुंडकर यांच्या नेतृत्वात रस्त्यावर निदर्शने करत आंदोलन करण्यात आले.

लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांच्या अविश्वास प्रस्तावावर दोन दिवसांच्या चर्चेनंतर विरोधकांनी एलपीजी तुटवड्याच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारला १२ मार्च रोजी घेरले.लोकसभेचे कामकाज सकाळी सुरू होताच याच मुद्द्यावरून विरोधक लोकसभेत आक्रमक झाले. सभागृह तहकूब झाल्यानंतर प्रामुख्याने काँग्रेसच्या खासदारांनी संसदेच्या आवारात मकरद्वारासमोर ठिय्या आंदोलन केले. यामध्ये प्रियंका गांधीही सहभागी झाल्या होत्या. त्यानंतर मकरद्वाराच्या पायऱ्यांवर काँग्रेसच्या निलंबित खासदारांनी आंदोलन केले. या आंदोलनामध्ये राहुल गांधींही सहभागी झाले. त्याचवेळी या खासदारांना चहा आणून दिला गेला, त्यांच्याबरोबर राहुल गांधी यांनी चहाचा पिऊन निदर्शनाला पाठिंबा दिला. संसद भवनाच्या प्रवेशव्दारा जवळ अशा पध्दतीने चहा-कॉफी पित पिकनीक करत संसदेच्या मयदिचा भंग केल्याचा आरोप करत भारतीय जनता पार्टीने या कृतीचा निषेध म्हणून संपूर्ण देशात राहुल गांधी यांच्याविरोधात निदर्शने केली. खामगाव शहरातील टॉवर चौकात भाजपा पदाधिकाऱ्यांनी रस्त्यावर उतरून काँग्रेस आणि राहूल गांधीच्या या कृतीचा निषेध करत घोषणाबाजी केली. यावेळी भाजपा मिडीया सेलचे महाराष्ट्राचे संयोजक सागर फुंडकर, नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर, गटनेते विजय उगले, भाजपा जेष्ठ पदाधिकारी शेखर पुरोहित, वैभव डवरे, नगरसेवक प्रविण कदम, राम मिश्रा, पवन गरड, मंगेश इंगळे, गौरव बोबडे, संजय शिनगारे, राजेंद्र धनोकार यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# भातकुली येथील हराळ परिवारातील जिजाऊ-रमाई-सावित्रीच्या लेकींचा हृदयस्पर्शी सत्कार

प्रतिनिधी १६ मार्च



**अमरावती :** मुला-मुलींनो शिक्षणात उंच उडान घ्या, माय-बापांचे कष्ट, श्रम आणि मेहनत वाया जाऊ देऊ नका, असे भावनिक आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी केले.

कामनापुर येथील सेवाभावी व्यक्तिमत्व . देवानंद हराळ यांच्या कन्या सुजाता व मनीषा यांची Maharashtra State Securityed Corporation मध्ये नियुक्ती झाल्याबद्दल दिनांक १४ मार्च २०२६ रोजी त्यांचा कौटुंबिक सत्कार या भागातील गोरगरिबांचे नेतृत्व करणारे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाशदादा साबळे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

याप्रसंगी संपूर्ण हराळ परिवार, शुभम पाटील भूगुल, अनिल खोब्रागडे, जयंत दाभाडे, सौरभ तायडे, कुणाल तायडे तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील व परिसरातील सर्व तरुण मुला-मुलींनी सुजाता व मनीषा यांचे अभिनंदन करून त्यांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला.

# मूल्यांवर आधारित समाज उभारणीसाठी अध्यात्म आवश्यक

प्रतिनिधी १६ मार्च

## राजयोगिनी सीता दीदी; ब्रह्मा कुमारींनी महापौर, उपमहापौर आणि नगरसेवकांचा सत्कार केला



**अमरावती:** मूल्यांवर आधारित समाज उभारणीसाठी आजच्या काळात अध्यात्म ही एक महत्त्वाची गरज आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणत नाही, तोपर्यंत समाजात खरा बदल अशक्य आहे. हे विचार ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, अमरावतीच्या जिल्हा संचालिका राजयोगिनी सीता दीदी यांनी व्यक्त केले.

ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, मुख्य सेवा केंद्र, अमरावती यांच्या वतीने विश्व परिवर्तन भवन येथे अमरावती महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर, उपमहापौर आणि सर्व नगरसेवक आणि नगरसेवकांचा उत्साही सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला शहरातील विविध भागातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि ब्रह्मा कुमारी कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे आणि सर्व नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरसेवकांना राजयोगिनी सीता दीदी यांनी शाल, नारळ आणि फुलांचा गुच्छ देऊन सन्मानित केले. त्यांना दैवी साहित्य आणि स्मृतिचिन्हे देखील प्रदान करण्यात आली.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सीता दीदी म्हणाल्या की, आजच्या वैज्ञानिक युगात मानवतेने प्रचंड भौतिक प्रगती केली आहे, परंतु मानसिक शांती, समाधान आणि आनंद यासारख्या खऱ्या मूल्यांपासून दूर जात आहे. समाजातील वाढती असहिष्णुता, तणाव आणि संघर्षावर अध्यात्म हा एकमेव कायमचा उपाय आहे. राजयोग ध्यानाद्वारे व्यक्ती स्वतःला ओळखतात, परमात्म्याशी जोडतात आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणतात.

त्या पुढे म्हणाली की, धर्माच्या नावाखाली शत्रुत्व बाळगण्याऐवजी, आपण सर्व एकाच परमपित्याची मुले आहोत ही भावना आपण दृढ केली पाहिजे.

# थकबाकीदार ग्राहकाकडे लागणार स्मार्ट मीटर

## पुनर्जोडणी शुल्कासह थकबाकी भरल्यावरच वीज पुरवठा होणार सुरू

प्रतिनिधी १६ मार्च

**अमरावती:** महावितरणने वीज बिल वसुली मोहिमेला गती दिली असून थकबाकीदार वीज ग्राहकांवर कठोर कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत थकबाकीदार ग्राहकांचे थेट वीज मीटर काढण्यात येत आहे. कारवाईनंतर खंडित करण्यात आलेला वीज पुरवठा पुनर्जोडणी शुल्कासह १०० टक्के थकबाकी भरल्यानंतरच सुरू करण्यात येणार आहे. तसेच थकबाकीसाठी काढण्यात आलेल्या मीटरच्या ठिकाणी प्राधान्याने स्मार्ट मीटर बसविण्याचे निर्देश मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिले आहेत.

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे १५ दिवस शिल्लक असताना अमरावती परिमंडळातील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील सुमारे ३ लाख वीज ग्राहकांकडे सुमारे ६०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे महावितरणने वीज बिल वसुलीसाठी आक्रमक भूमिका घेतली असून, थकबाकी न भरल्यास थेट वीज मीटर काढून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### शेजाऱ्याकडून वीज घेतल्यास गुन्हा दाखल

थकबाकीमुळे मीटर काढल्यानंतर काही ग्राहकांकडून शेजाऱ्यांकडून अनधिकृत वीज पुरवठा घेण्याचे प्रकार आढळत असल्याने महावितरणने याबाबत कठोर इशारा दिला आहे. अशा प्रकारे वीज घेणे किंवा देणे हे विद्युत कायदा २००३ अंतर्गत गुन्हा असून संबंधित ग्राहकांसह अनधिकृतपणे वीज देणाऱ्या शेजाऱ्यांवरही गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

# तहसीलदार साहेब नाही तहसीलदार म्हणा

## शालेय उपक्रमांतर्गत क्षेत्रभेटीदरम्यान तहसीलदार प्रदीप शेवाळे यांचे पीएम श्री सेमी इंग्रजी विद्यार्थ्यांशी थेट संवाद

प्रतिनिधी १६ मार्च



**धारणी:** धारणी स्थित पीएम श्री सेमी इंग्रजी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मुलांची शाळेंच्या सहशालेय उपक्रमांतर्गत क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले या क्षेत्रीय भेटी अंतर्गत तालुक्यातील तहसील कार्यालय, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पोलीस ठाणे आदी स्थळांना विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेटी दिल्यात भेटीदरम्यान धारणी तहसीलचे तहसीलदार प्रदीप शेवाळे व तालुका कृषी अधिकारी उमेश यादव यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधित चर्चा करून तालुक्याची माहिती सामायिक केली हि बाब सर्वांना आश्चर्य करणारी होती, तालुक्याचे तहसीलदार प्रदीप शेवाळे यांच्यातील विद्यार्थी जीवन जिवंत होत विद्यार्थ्यांशी मिसळून कार्यालयातील सर्व विभाग व इतर तालुक्यातील ठिकाणाविषयी संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली, यावेळी नायब तहसीलदार राजेश माळी व वरिष्ठ लिपिक निलेश सपकाळ सुद्धा उपस्थित होते, मोठ्या पदावर असताना आपल्या सामान्यपणाची जाणीव करीत तहसीलदार प्रदीप शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना साहेब म्हणू नका फक्त तहसीलदार म्हणा. अशा शब्दात विद्यार्थ्यांशी संवाद साधत असताना एका विद्यार्थ्याने तहसीलदारांना आपले वेतन किती असाही सवाल केला, तहसील कार्यालयातील क्षेत्रीय भेट ही विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाने आनंद निर्माण करणारी होती. तालुका कृषी अधिकारी उमेश जाधव यांनी सुद्धा विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला कृषी विभागातील विविध नेऊन फळझाडे, पिकांविषयी व विविध कृषी विषयक आवश्यक असणाऱ्या सर्व माहिती देत कृषी विभाग हे मानवी जीवनातील महत्त्वाचे आणि अविभाज्य घटक आहे, भारत देश हे कृषिप्रधान देश असून कृषी विभाग नाही राहिला तर माणसाचे जगणे अशक्य होईल अशा शब्दात कृषी विभागाची माहिती विद्यार्थ्यांना देऊन कृषी विषयक माहिती विद्यार्थ्यांना दिली.

# महावितरणच्या ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ला राष्ट्रीय पुरस्कार; देशातील सर्वोत्तम स्मार्ट ग्रिड प्रकल्प

प्रतिनिधी १६ मार्च



**अमरावती:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व ग्राहकांना परवडणाऱ्या दरात वीज उपलब्ध करून देणे आणि तांत्रिक अचूकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने स्मार्ट ग्रीड अंतर्गत विकसीत केलेली ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ देशात सर्वोत्तम ठरली आहे. इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषदेमध्ये शुक्रवारी या तंत्रज्ञानासाठी महावितरणचा ‘आयएसजीफ इनोव्हेशन अवॉर्ड २०२६’ या सर्वोच्च पुरस्काराने गौरव करण्यात आला. नवी दिल्ली येथे ’इंडिया स्मार्ट युटिलिटी विक २०२६’ अंतर्गत १२व्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषद झाली. महावितरणच्या ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ची अंमलबजावणी व फलनिष्पत्तीचे सादरीकरण तीत करण्यात आले. त्याचा अभ्यास करून पाच सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने या तंत्रज्ञानाची परिषदेतील सर्वोत्तम पुरस्कारासाठी निवड केली. सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पी. उमाशंकर यांच्याहस्ते कार्यकारी संचालक श्री. दत्तात्रेय पडळकर व मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) अविनाश हावरे यांनी महावितरणच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला. मुख्यमंत्री . देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऑनलाइन ग्राहकसेवा आणि अंतर्गत तांत्रिक कार्यप्रणालीला डिजिटल पद्धतीची जोड दिली आहे.

# राष्ट्रीय लोक अदालत मध्ये २ कोटी ५४ लाखाची वसुली

प्रतिनिधी १६ मार्च

**खामगाव :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधीकरण यांचे निर्देशाने १४ मार्च रोजी जिल्हा न्यायालय-१ खामगांव यांचे परिसरात तडजोडीयुक्त प्रकरणे एन. आय. अक्ट १३८, बँक रिकव्हरी सुट, तसेच वादपूर्व प्रकरणांचे राष्ट्रीय लोकअदालत आयोजीत करण्यात आले होते. सदर लोकअदालतमध्ये एकूण ०४ पॅनल नेमण्यात आले होते. पॅनल १ वर प्रमुख जी. बी. जाधव, पंच) ए. एस. क्षिरसागर, पॅनलक्र. २ वर बी.ए.पी. कोकरे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-२ तथा अति सत्र न्यायाधीश, खामगांव तर पंच म्हणुन एस.डी. गावंडे, विधीज्ञ, वकील संघ, खामगांव, पॅनल क्रमांक ०३ वर पॅनल प्रमुख म्हणुन बी. बी. शेळके सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर खामगाव एन. व्ही. इंगळे, पॅनलक्र. ४ वर यु.व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश व. स्तर खामगांव तर पंच म्हणून डी. आर. वाधवानी, विधीज्ञ हे होते. तसेच सह दिवाणी न्यायधीशक. स्तर श्रीमती एफ. टी. शेख, दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व्ही. एन. डी. गोळे व चौथे दिवाणी न्यायाधीश क. स्तर सौ. सी. वाय. नेवारे उपस्थित होते.सदर लोकअदालत मध्ये कलम १३८ एन. आय. अॅक्टचे एकुण ६२३ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी ४८ प्रकरणामध्ये यशस्वी तडजोड होवून रक्कम रु. ५५२७२७०/- इतकी तडजोड रक्कम म्हणून वसूल झाली. तसेच मोटार अपघात प्राधीकरणाचे एकूण ६९ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी प्रकरणांत यशस्वी तडजोड होवून रक्कम ३०००००० /- इतकी वसुली करण्यात करण्यात आली.फौजदारी प्रकरणे ७०९ ठेवण्यात आली होती, त्यापैकी १४८ प्रकरणात तडजोड होवून द्रव्यदंड रक्कम रु. ३८३००/- वसूल झाला.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा-आ.संजय खोडके

## अमरावतीच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आरबीएसके योजनेतून १२ बालकांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

प्रतिनिधी १६ मार्च



**अमरावती :** नवजात बालकांमधील जन्मजात व्यंग ओळखून त्यांची तपासणी व शस्त्रक्रिया द्वारे बालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (आरबीएसके) च्या माध्यमातून अमरावती स्थित विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात आतापर्यंत १२ बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. बालकांच्या आरोग्याच्या बाबतीत राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब मंत्री ना.प्रकाश आबिटकर चांगले काम करत आहे. पुढेही राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम चांगल्या पद्धतीने राबविण्यासाठी व जास्तीत जास्त बालरुग्णांना याचा लाभ मिळावा म्हणून आरबीएसके योजनेचा अधिक विस्तार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा, अशी लक्षवेधी मागणी आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून राज्य शासनाकडे केली आहे.

राज्यविधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात बोलत असतांना आ. संजय खोडके यांनी सांगितले कि, आरोग्य सुविधांच्या बाबतीत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग अत्यंत तत्परतेने काम करत आहे.नवजात बालकांमधील जन्मजात व्यंग ओळखून दोन वर्ष वयाच्या आतील बालकांच्या विविध जटिल शल्यक्रिया या महात्मा फुले जनआरोग्य योजना असो किंवा राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातून मोफत करण्यात येतात. शासनाच्या वतीने या शस्त्रक्रियेचा खर्च उचलला जात आहे. परंतु योजनेमध्ये केवळ २ वर्षाच्या आतील बालकांना लाभ दिला जात असल्याने अनेक वेळा ते योजनेच्या लाभात बसत नाही. म्हणून बालरुग्णांना योजनेच्या लाभात सामाविष्ट करण्यासाठी वयोमर्यादा वाढविण्यात यावी , अशी सुचना आ. संजय खोडके यांनी केली. पुढे बोलतांना आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, अमरावती मधील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथे आरबीएसके योजनेतून १२ बालरुग्णांवर शल्यक्रिया करण्यात आली. त्या शस्त्रक्रियेचा खर्च जिल्हा नियोजन समिती च्या नावीन्यपूर्ण योजनेतून करण्यात आला. यासाठीच्या ज्या वैद्यकीय मशिनरीज आहेत , त्यांची कालमर्यादा पाच वर्षापर्यंत आहे. मशीन बिघडल्यानंतर बालरुग्णांवर शल्यक्रिया करायच्या असल्यास अडचणी निर्माण होईल.

# युवा स्वाभिमान पार्टीची कोअर कमिटीची बैठक

प्रतिनिधी १६ मार्च



**अमरावती :** युवा स्वाभिमान पार्टी अमरावती शहर जिल्ह्यातील महिला व पुरुष आघाडी तसेच विविध समित्यांच्या अध्यक्षांसह संपूर्ण कार्यकारिणी निस्कासित करण्यासंदर्भात राष्ट्रीय कोअर कमेटीची महत्वाची बैठक संपन्न बैठकीमध्ये सर्व समितीच्या अध्यक्ष व त्यांची कार्यकारणी निस्कासित करण्याचा झाला.

युवा स्वाभिमान पार्टीने अमरावती महानगरपालिका निवडणुकीमध्ये दणदणीत विजय मिळविला – यामध्ये नगरसेवक व पदाधिकारी यांच्यामध्ये समन्वय तसेच नवीन पदाधिकारी यांना संधी देण्याकरीता त्याचप्रमाणे संघटन अधिक मजबूत व्हावे यासाठी पक्ष नेतृत्वाने संघटनात्मक बदल करण्याचा घेतला निर्णय नवा अध्यक्ष व विविध समित्याच्या अध्यक्षाची होणार लवकरच घोषणा - नवीन नियुत्त्या होई पर्यत पक्षाचे सर्व कामकाज वरिष्ठ पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली चालविण्याचा बैठकीमध्ये झाला निर्णय.

सर्वसामान्य जनतेचे, विद्यार्थ्यांचे, कामगारांचे प्रश्न सोडविण्याकरीता आ.रवि राणा यांनी युवा स्वाभिमान पार्टीची स्थापना केलेली होती. या पार्टीच्या माध्यमातुन समाजकारण करण्याचा उद्देश असून सर्व घटकातील नागरीकांना न्याय मिळवुन देण्याकरीता सदैव युवा स्वाभिमान पार्टी नव्हे तर परीवार म्हणुन काम करीत असतात.

त्याच अनुषंगाने युवा स्वाभिमान पार्टीच्या राष्ट्रीय कोअर कमेटीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत अमरावती शहर जिल्ह्यातील महिला व पुरुष आघाडी तसेच विविध समित्यांच्या अध्यक्षांसह संपूर्ण कार्यकारिणी निस्कासित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. पक्ष संघटन अधिक सक्षम व प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती पक्षाच्या वतीने देण्यात आली.

बैठकीमध्ये अमरावती शहरातील सर्व समित्यांच्या अध्यक्षांसह त्यांच्या कार्यकारिणीला निस्कासित करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. पक्ष संघटनात अधिक समन्वय, शिस्त व कार्यक्षमता निर्माण व्हावी तसेच नव्या कार्यकर्त्यांना नेतृत्वाची संधी मिळावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# पीएम किसान सन्मान निधीचे शुक्रवारी वितरण

अकोला, दि. ११ : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ कालावधीतील २२ व्या हप्त्याचे वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुवाहाटी येथील ज्योती-विष्णू आंतरराष्ट्रीय केंद्र येथे होणार आहे. केंद्र शासनाने शेतक-यांना निश्चित उत्पन्न देण्याकरीता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजना माहे फेब्रुवारी २०१९ पासून सुरु केली आहे. या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) दोन हजार रू. प्रति हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी ६ हजार रू. त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे. पी. एम. किसान योजने अंतर्गत राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापुर्वी एकूण २१ हप्त्यांमध्ये सुमारे रू. ३९,३०० कोटीचा लाभ जमा झालेला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेच्या लाभासाठी केंद्र शासनाकडून लाभार्थीने भूमी अभिलेख नोंदणी अद्यावत करणे.

# सावरा आरोग्य उपकेंद्रात उपचारा अभावी ग्रामीण जनता त्रस्त, रिक्त पदांचा प्रश्न कायम

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोट:** तालुक्यातील सावरा प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत उपकेंद्रामध्ये रिक्त पदांमुळे रूग्णसेवा विस्कळीत झाली आहे. ११ पदे ही रिक्त आहे. तसेच एका आरोग्य उपकेंद्रावर समुदाय आरोग्य अधिकारी पद रिक्त आहे. त्याचा परिणाम रुग्णसेवा तसेच लसीकरणावर होत आहे.

सावरा प्राथमिक आरोग्य केंद्रात चार पदे रिक्त आहेत. अधिकाऱ्यांच्या सांगण्याप्रमाणे प्रशासकीय कारणाने ही पदे रिक्त झाली आहे आणि त्या पदांचा अतिरिक्त प्रभार हा दुसऱ्या कर्मचाऱ्यांकडे देण्यात आला आहे पण त्या कर्मचाऱ्यांनी त्यांची उपकेंद्र सांभाळायची इतकी दुसरी उपकेंद्र सांभाळायचे आहेत हा प्रश्न जनतेला पडला आहे जर एखादा प्रभारी किंवा अतिरिक्त



कर्मचारी स्वतःची मुख्यालय सोडून तर दुसऱ्या ठिकाणी हा ड्युटी करिता जात असेल तर त्या ठिकाणची रुग्ण सेवा प्रभावित झाली आहे.

सावरा प्राथमिक आरोग्य केंद्र हा महत्त्वाचा रुग्णांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे सेंटर आहे.

या आरोग्य केंद्राचा कारभार खारपान पट्ट्या पासून तर आदिवासींच्या पट्ट्यापर्यंत सातपुड्याच्या पायथ्याशी आदिवासी नागरिकांच्या जीवाची जबाबदारी या मुख्य केंद्रावर येऊन ठेवली आहे, केंद्राच्या भरोशावर अंदाजे २६ गावांचा हजारोच्या संख्येने रुग्णाच्या वाढत्या संख्येचा भार हा आरोग्य केंद्रावर अवलंबून आहे, पण येथील अपुऱ्या स्टॉप मुळे रुग्णांची गैरसोय होत आहे.

**काय आहे परिस्थिती ?**
शेकडो लोकसंख्येची भिस्त असलेल्या उपकेंद्रामध्ये कर्मचारीच उपलब्ध नसल्याने साध्या तापाच्या गोळयासाठी ही रुग्णांना मैलो मैल पायपीट करून तालुका किंवा जिल्हा रुग्णालयाची वाट धरावी लागत आहे. प्रसुती, लहान मुलांचे लसीकरण आणि प्रथम उपचार यासारख्या अत्यावश्यक सेवावर याचा थेट परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी उपकेंद्रांना कुलूप असल्याने रुग्णांना खाजगी डॉक्टरांकडे जाऊन अव्वाच्या सव्वा पैसे मोजावे लागत आहेत. पर्यायाने रुग्णांना मोलमजुरी करावी की पोट भरावे हा प्रश्न निर्माण झाला आहे.

ग्रामीण जनतेचे आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी शासनाने तात्काळ कायमस्वरूपी पदभरती करून उपकेंद्रांना सक्षम करावे अशी मागणी आहे. अतिरिक्त प्रभार देणे हे त्या समस्येचे समाधान नाही याच उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांना दुसरा एक उपकेंद्राचा अतिरिक्त प्रभार दिल्या जात असेल तर त्यांचे मुख्यालय असलेल्या ठिकाणचा रुग्णसेवेचे काय हा अतिरिक्त प्रभार दिल्याने ती समस्या सुटू शकत नाही. याकडे त्वरित लक्ष द्यावे अन्यथा वंचित बहुजन आघाडी तर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल.
**केशव बिलबिले**

**रुग्णांचे हाल आणि वाढता खर्च**
अपघात किंवा सर्पदंशासारखा आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णांचा जीव धोक्यात येत आहे.
लसीकरण खोळंबले, आरोग्य सेविकांची पदे रिक्त असल्याने बालकांच्या नियमित लसीकरण मोहिमेत खंड पडत आहे.
**संदीप धर्माळे**, प्रभारी सरपंच बांबर्डा

आयुष्यमान आरोग्य मंदिर सावरा येथील काही पद हे प्रशासकीय कारणाने रिक्त झाल्याने त्या ठिकाणी पर्यायी स्वरूपात अतिरिक्त प्रभार हा देण्यात आला आहे. येत्या कालावधीत नियमित स्वरूपात कर्मचारी यांची नियुक्ती केली जाईल.
**प्रवीण चव्हाण**, तालुका आरोग्य अधिकारी

## कुंभारीत 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरा'त नागरिकांचा मोठा प्रतिसाद

**अकोला :** राजस्व मंडळ शिवणी अंतर्गत कुंभारी येथे आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या शिबिरात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना शासनाच्या योजनेंतर्गत आर्थिक मदतीचे धनादेश मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. त्यामुळे संकटग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन कुंभारी येथील सरपंच ऋषिकन्या अतकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार खेळकर, मंडळ कृषी अधिकारी एस. डी. गाडेकर, ग्रामपंचायत अधिकारी ज्योती आठवले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्रावण इंगळे, माजी जि.प. सभापती चंद्रशेखर पांडे गुरुजी, माजी सरपंच बाळासाहेब अतकरे, नगरसेवक प्रवीण पातोळे, शेख शमसू भाई, बोंदरखेड सरपंच नंदकिशोर गोरले, सोनाळा सरपंच महानाम फुलके, जय बजरंग विद्यालयाचे मुख्याध्यापक सूर्यभान नागुलकर, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार तसेच जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक संतोष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

## दशा सोरठिया महिला मंडळाचा आरोग्यदायक महिला दिन

**अकोला:** गुजराती दशा सोरठिया वणीक महिला मंडळाच्या वतीने स्थानीय अमृतवाडी सभागृहात आरोग्यदायक महिला दिन साजरा करण्यात आला. महिला मंडळाच्या अध्यक्ष राखीबेन कोठारी यांच्या अध्यक्षतेत संपन्न या महिला दिन कार्यक्रमाचा प्रारंभ फिजिओथेरपिस्ट डॉ कीर्ती कोठारी यांच्या कार्यशाळेने झाला. यात कीर्ती कोठारी यांनी शारीरिक फिटनेस वर व्याख्यान सादर करीत पावर पॉइंटद्वारे व्यायामाचे सादरीकरण केले. महिलांसाठी कोणता व्यायाम व शारीरिक फिटनेस आवश्यक आहे याचे उदाहरण अनेक माध्यमातून दिले. यावेळी राष्ट्रीय महिलांवर आधारित फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आली.

# नगरसेवक सुनील इन्नाणी यांचा मारवाडी समाजातर्फे सत्कार

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला:** अकोला महानगरपालिकेचे नवनिर्वाचित स्वीकृत सदस्य सुनील इन्नाणी यांचा अलीकडेच गौरक्षण रोडवरील त्यांच्या निवासस्थानी विशेष सत्कार करण्यात आला. मारवाडी संमेलन आणि मारवाडी युवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. सत्काराला उत्तर देताना सुनील इन्नाणी यांनी अकोल्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. 'माझी पावले नेहमी विकासात्मक मार्गानेच पडतील,' असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. आपल्या या नियुक्तीचे संपूर्ण श्रेय त्यांनी वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा बाळासाहेब आंबेडकर यांना दिले. या कार्यक्रमाला मारवाडी संमेलनाचे प्रमुख पदाधिकारी निकेश गुप्ता, ब्रिजमोहन चितलांगे, जयप्रकाशजी चांडक, श्याम शर्मा, सुरेश अग्रवाल (गुरुजी),



कटारियाजी, श्रीकांत गोयनका, कुंजीलाल सोनारीवाल, संतोष छाजेड, मारवाड़ी युवा मंच के भुषन अग्रवाल, सर्वेश अग्रवाल सोनालावाला, नमन खंडेलवाल, प्रदीप रांदड, रोहीत रुंगटा, निलेश बोर्डिवाला, हरीष खंडेलवाल, निर्मल समदाडीया, अभिजीत गोयनका, सुमीत गोयनका यांची उपस्थिती होती.

# पणज येथे समाधान शिबिराला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोट:** पणज येथे महसूल मंडळातील सर्व गावांसाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराला पणज मंडळातील ग्रामपंचायतींचे सरपंच व उपसरपंच यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदर शिबिराचे ठिकाणी तहसील कार्यालय अकोट, उपविभागीय अधिकारी कार्यालय अकोट, पंचायत समिती अकोट, तालुका कृषी अधिकारी, अकोट तालुका आरोग्य अधिकारी अकोट, महावितरण कार्यालय अकोट, पशुसंवर्धन विभाग महिला व बाल



विकास विभाग चे अधिकारी व कर्मचारी हजर होते. तसेच पणज मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक, ग्रामसेवक हजर होते.

समाधान शिबिराचे ठिकाणी उपस्थित नागरिकांना विविध दाखले, सातबारा, प्रमाणपत्र, रेशन कार्ड, फेरफार, यांचे वाटप करण्यात आले. कृषी विभागामार्फत यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर व ट्रॉलीचे वितरण करण्यात आले.

ङसंगायो विभाग तहसील कार्यालय अकोटङ मार्फत शिबिराचे ठिकाणी उपस्थित दिव्यांग लाभार्थी व इतर लाभार्थी यांची अपडेशन, ई केवायसी करण्यात आली तसेच हयातीचे प्रमाणपत्र जमा करून घेण्यात आले.

# वडाळी देशमुखला भागवत कथेमध्ये हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोट:** तालुक्यामधील श्री संत चतुर्भुज महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री एकनाथ षष्ठी निमित्त श्री शिव महापुराण कथेचे आयोजन केलेले आहे. त्याच अनुषंगाने शिव महापुराण कथा वाचक ह भ प ज्ञानेश्वर महाराज शेगाव यांच्या कथेचा भाविक आनंद घेत आहेत. कीर्तन होत आहे. मुस्लिम समाज बांधव अन्सारअली अफसरअली देशमुख यांचा महाप्रसादात सहभाग असतो. हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन त्यातून घडते.

कीर्तनकार ह भ प धीरज महाराज चांदुरकर इटकी अंतरगाव यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. कथेमध्ये शंकर-पार्वती विवाह सोहळा हा डोळ्याचे पारणे फेडणारा ठरला. विशेष देखाव्यातून बैल व शिव-पार्वती सजवलेले वाजत गाजत बँड पथक ढोल नंगाऱ्यासह मंडपामध्ये



आणून लग्न लावणे व मंगलाष्टक, गुलालाची उधळण झाली. महिला व पुरुष भाविकांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला. रविवारी ह भ प गजानन महाराज देठे शिवचरित्रकार जालना व यांचे कीर्तन झाले. भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजन समितीच्या सहकार्याने सोहळा साजरा केला जातो आहे.

# गजानन हरणे यांची मराठा सेवा संघाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

प्रतिनिधी १६ मार्च



**अकोला:** जिल्ह्याच्या सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले ज्येष्ठ समाजसेवक गजानन ओंकार हरणे यांची अ.भा.मराठा सेवा संघाच्या

जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. अ.भा. मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष वामनराव भिलारे, राष्ट्रीय संघटक दादाराव पाथरीकर यांनी ही निवड जाहीर करत मराठा योद्धा गजानन हरणे यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीमुळे अकोला जिल्ह्यातील मराठा समाजामध्ये उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. मराठा समाजाच्या हक्कासाठी सुरू असलेल्या आंदोलनात त्यांनी सातत्याने सहभाग नोंदवून समाजातील प्रश्नांना आवाज दिला. तसेच त्यांना १०० वर पुरस्कारासह मराठा समाज भूषण पुरस्कार सुद्धा मिळालेला आहे. मराठा आरक्षण चळवळीचे प्रमुख नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला त्यांनी खंबीर पाठिंबा देत विविध आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. मराठा, देशमुख, पाटील आणि कुणबी समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. अ.भा.मराठा सेवा संघाच्या समाजातील विविध घटकांना एकत्र आणून संघटनात्मक बळकटी निर्माण करण्यासाठी ते कार्यरत राहतील, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. गजानन हरणे यांच्या निवडीचे अकोला जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत होत आहे.

# इकरा इंग्लिश स्कूलमध्ये इफ्तारचे आयोजन



प्रतिनिधी १६ मार्च

**हातरूण:** इकरा इंग्लिश स्कूल अँड जुनियर कॉलेज मध्ये पवित्र रमजान निमित्त इफ्तारचे आयोजन शाळा अध्यक्ष शेख महेमुद राही, सचिव शेख वसीम अहमद शेख हसन यांच्या कडून करण्यात आले होते. मुस्लिम बांधवांनी उपस्थिती राहून रोजा सोडला. हिंदू - मुस्लिम सर्वधर्म सदभाव राहून सौहार्द वाढावा. ग्रामीण भागात अशा प्रकारचा कार्यक्रम ठेवल्यामुळे इकरा स्कूलच्या व्यवस्थापनाचे कौतुक होत आहे. मुख्याध्यापक शेख वसीम कुरेशी, यासीर खान अशरफ खान, मोहम्मद तनवीर, नजीम, सैय्यद काझीम उपस्थित होते.

# आजपासून श्रीनाथ दत्त मंदिरात माधवनाथ महाराज जन्मोत्सव सोहळा

प्रतिनिधी १६ मार्च



**अकोला:** महानगरात लाखो भक्तांचे आराध्य परमपूज्य माधवनाथ महाराज यांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. रामदासपेठ परिसरातील श्रीनाथ दत्त मंदिरात आज सोमवार दिनांक १६ मार्च ते गुरुवार दि १९ मार्च पर्यंत हा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवात सोमवार दिनांक १६ मार्च रोजी ३ वाजता दाबकी रोड येथील स्वरार्चना महिला भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम होऊन सायं ७ वाजता सौ वसुधाताई विनोद देव यांचे श्री माधवनाथ महाराज यांचे तत्त्व विचार यावर प्रवचन होणार आहे. मंगळवार दिनांक १७ मार्च रोजी दुपारी ३ वाजता जठारपेठ येथील गुरुमाऊली भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम होऊन सायंकाळी ७ वाजता सौ वसुधाताई विनोद देव यांचे माधवनाथ महाराज यांच्यावर प्रवचन होणार आहे. त्याचप्रमाणे बुधवार दिनांक १८ मार्च रोजी दुपारी ३ वाजता डाबकी रोड येथील स्वरादीती महिला भजनी मंडळाचे भजन होऊन सायंकाळी ७ वाजता सौ वसुधाताई विनोद देव यांचे माधवनाथ महाराजांवर प्रवचन होणार आहे. या उत्सवात गुरुवार दिनांक १९ मार्च रोजी श्री माधवनाथ महाराज जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे. या दिनी सकाळी ६ वाजता पंचांग पूजन, वाचन व ध्वजारोहण होऊन माधवनाथ महाराज जन्मोत्सव गुलाल कार्यक्रम होणार आहे. स ७ वाजता श्री राज राजेश्वर रुद्र मंडळाचा लघु रुद्र सोहळा होऊन दुपारी १२ वाजता आरती कार्यक्रम होऊन सायं ६ वाजता श्रीनाथ गीतांजली पूर्णारती भजन होणार आहे. उत्सव दरम्यान सायं ५-३० वाजता दैनिक उपासना करण्यात येणार असून या पु माधवनाथ महाराज जन्मोत्सवाचा सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# गुढीपाडवा निमित्त मिनी गुढीला बाजारपेठेत मोठी मागणी

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला:** हिंदू नववर्षाची सुरुवातीचा गुढीपाडवा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यंदा विशेषतः मिनी गुढीला ग्राहकांकडून मोठी मागणी वाढल्याचे चित्र दिसत आहे.

परंपरेप्रमाणे घराबाहेर उभारण्यात येणाऱ्या गुढीबरोबरच आता घरातील सजावटीसाठी लहान आकाराच्या मिनी गुढीचा ट्रेंड वाढत आहे. बाजारात रंगीबेरंगी कापड, आकर्षक माळा, छोट्या कलशांसह विविध प्रकारच्या मिनी गुढी विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. काही मिनी गुढी पारंपरिक स्वरूपात तर काही आधुनिक डिझाइनमध्ये तयार करण्यात आल्या आहेत.

व्यस्त जीवनशैली आणि फ्लॅट संस्कृतीमुळे अनेकांना मोठी गुढी उभारणे शक्य होत नसल्याने ते मिनी गुढीला पसंती



देत आहेत. तसेच या मिनी गुढी भेटवस्तू म्हणूनही मोठ्या प्रमाणात दिल्या जात आहेत. त्यामुळे बाजारातील दुकानदारांनीही विविध प्रकारच्या मिनी गुढींचा साठा ठेवला आहे.

दरम्यान, मिनी गुढीची किंमत साधारणपणे ५० रुपयांपासून १०० रुपयांपर्यंत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. गुढीपाडवा जवळ येत असताना ग्राहकांची गर्दी वाढत असून बाजारपेठेत खरेदीला वेग आला आहे.

# सुखदुःखाच्या पलीकडची स्थिती म्हणजे सुख- डॉ. जयवंत महाराज बोधले



प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला :** सुख हा जीवनातील सर्वात मोठा व अत्यावश्यक असा शब्द आहे. या शब्दाच्या चक्रात मनुष्य सदा जीवनभर कार्य करीत असतो. हा शब्द सर्वांना परिचित आहे. हा शब्द केवळ उच्चारण करून नाही तर या शब्दाची साक्षात अनुभूती घ्यावी लागते. या अनुभूतीलाच जास्त महत्त्व आहे. जोपर्यंत या सुखाचा अनुभव येत नाही, तोपर्यंत समाधान होत नाही. अशा या समाधानाला संतांनी मोठे महत्व दिले असून संतांच्या समाधानाचा अन्वयार्थ हा वेगळा असून हेच शाश्वत समाधान मनुष्याचे ध्येय असले पाहिजे असा हितोपदेश हभप जगन्नाथ महाराज बोधले यांनी केला. श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव सेवा समिती, गायत्री नगर कौलखेड च्या वतीने गायत्री नगरच्या प्रांगणात हभप प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या किर्तन महोत्सवात पंढरपूर येथील कीर्तनकार हभप डॉ जयवंत महाराज बोधले यांनी कीर्तनाचे सहावे पुष्प सादर केले. ठसदा नामघोष करू हरिकथा, तेणे सदा चित्ता समाधान, सर्व सुख ल्यालों सर्व अलंकार, आनंदें निर्भर डुलतसों,

असो ?सा कोठें आठवचि नाहीं, देहींच विदेही भोगुं दशा, तुका म्हणे आम्ही झालों अग्निरुप। लागों नेदूं पापपुण्य अंगाठ या तुकोबारायांच्या अभंगावर त्यांनी या सत्रात किर्तन सादर केले. ते म्हणाले, समाधान हे वस्तूच्या प्राप्तीमध्ये नसून ते चित्तात असते.

# आकोलखेड ऑरेंज आर्मी संघ ठरला उपविजेता



प्रतिनिधी १६ मार्च

**अकोट:** तालुक्यातील आकोलखेड येथील ऑरेंज आर्मी संघ ता. १५ मार्च रोजी दनोरी पनोरी येथे क्रांती प्रिमीयर लिग सिझन ५ मध्ये उपविजेता ठरला आहे. व्यसन मुक्त युवा फॉर विकसित भारत आनंद देशमुख मित्र मंडळ व्यसन मुक्ती अभियान अंतर्गत आयोजित भव्य क्रिकेट स्पर्धेची सुरुवात १ मार्च पासून झाली. सामने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्टेडियम दनोरी पनोरी वर खेळविण्यात आले. अंतिम सामना हा दोन इनिंग मध्ये खेळविण्यात आला.

प्रथम इनिंग ८ ओव्हर व व्दितीय इनिंग ६ ओव्हरचा खेळ झाला. ऑरेंज आर्मी आकोलखेड विरुद्ध शिवराज ११ चोहोट्टा बाजार यांच्यामध्ये खेळविण्यात आला. यामध्ये शिवराज ११ हा संघ विजेता ठरला तर ऑरेंज आर्मी आकोलखेड हा संघ उपविजेता ठरला. यावेळी उपविजेता संघाला ट्रॉफी व एकतीस हजार रुपये बक्षिस देण्यात आले. ऑरेंज आर्मी संघ आकोलखेड च्या स्पॉन्सरसह प्रत्येक खेळाडूने प्रचंड मेहनत घेतली. या विजेत्यामुळे सर्व टीमचे गावामधून कौतुक व अभिनंदन होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. १६ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# कॉल डिटेलवर तपास केंद्रीत; आतीश देशमुख हत्या

प्रतिनिधी १६ मार्च

**यवतमाळ :** लासीना रेल्वे क्रॉसिंगजवळ अज्ञात व्यक्तींनी धारदार शस्त्राने सपासप वार करून आतीश देशमुख रा पिंपळगाव या युवकाची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी तपासाची दिशा कॉल डिटेल्सकडे केंद्रीत केली आहे.

आतीश सुभाष देशमुख (वय ३५) याला शनिवारी रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास त्याला एक फोन आला होता. त्या फोननंतर तो आपले वाहन घेऊन घराबाहेर पडला. मात्र रात्री उशिरापर्यंत तो परतला नाही. त्यामुळे चिंताग्रस्त झालेल्या नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत माहिती दिली होती.

दरम्यान रविवारी सकाळी यवतमाळ–अमरावती मार्गावरील लासीना रेल्वे क्रॉसिंगजवळ एका तरुणाचा मृतदेह आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास



केला असता मृतदेहाची ओळख आतीश देशमुख अशी पटली.

प्राथमिक तपासात हल्लेखोरांनी प्रथम त्याच्या डोळ्यांत मिरची पूड टाकून त्याला असहाय केले. त्यानंतर धारदार शस्त्राने पोट, मान तसेच शरीराच्या इतर भागांवर सपासप वार करून त्याची हत्या केल्याचे समोर आले आहे.

> ■ घटनेची माहिती मिळताच लाडखेड पोलीस ठाण्याचे पथक, स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी), फॉरेन्सिक लॅबचे अधिकारी तसेच नेर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात पाठविला आहे.

दरम्यान, मृतकाला आलेल्या फोनच्या कॉल डिटेल्सवर पोलिसांनी तपास केंद्रीत केला आहे. लाडखेड पोलीस आणि एलसीबीचे पथक संयुक्तपणे या प्रकरणाचा तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे.

# मुल पळविणारी टोळी'च्या संशयातून मारहाण; अपहरण प्रकरण उघड

## छत्तीसगडच्या व्यक्तीला बांधून नेण्याचा प्रकार; गावकऱ्यांच्या हल्ल्यात सात जण जखमी

प्रतिनिधी १६ मार्च







**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यात संशयातून घडलेल्या मारहाणीची घटना समोर आली आहे. मुल पळविणारी टोळी असल्याचा संशय घेत ग्रामस्थांनी एका चारचाकी वाहनातील सात जणांवर दगडफेक व मारहाण केली. या घटनेत सर्वजण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत.

बोरी अरब (ता. दारव्हा) येथील रामा शामराव जाधव (वय ३९) हा डुकरांच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो. त्याचे छत्तीसगड राज्यातील बिलासपूर येथील लकी खाटीक (वय ४०) याच्यासोबत डुकरांच्या व्यवहाराचे संबंध होते. जाधवने दिलेल्या डुकरांचे सुमारे ३ लाख ७० हजार रुपये थकीत असल्यामुळे दोघांमध्ये वाद सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. जाधवच्या म्हणण्यानुसार लकी खाटीक हा फोनवरून वारंवार जीव मारण्याच्या धमक्या देत होता. रविवारी (१५ मार्च) सकाळी जाधव हा आपल्या सहकाऱ्यांसह डुक्कर खरेदीसाठी इनोव्हा (क्र. एमएच-४३-ए-९९८८) या वाहनाने मुकूटबन परिसरात गेला होता. त्याच्यासोबत सौरभ राजेश खोपे (वय १९), अविनाश सुनिल तायडे (वय २०), उमेश गोपाल नायकर (वय ४६), राहुल किसन नेमाडे (वय २४), विलास विजय नागपुरे (वय २४) व राहुल कांबळे (वय २३) हे सर्व बोरी अरब येथील रहिवासी होते. मुकूटबन बसस्थानकाजवळ जाधवला छत्तीसगडमधील संजय नावाची ओळखीची व्यक्ती दिसली. तो डुकरांच्या केसांचे ब्रश विक्रीसाठी या परिसरात येत असल्याने जाधवला परिचित होता. मात्र, लकी खाटीकने आपल्याला मारण्यासाठी माणूस पाठविल्याचा संशय असल्याने जाधव व त्याच्या सहकाऱ्यांनी संजयला जबरदस्तीने वाहनात बसवले. त्याचे तोंड तसेच हात-पाय कापडाने बांधून त्याला बोरी अरबकडे घेऊन निघाल्याचे सांगण्यात आले. दरम्यान घाटंजी मार्गावरील कामठवाडा जवळ वाहनात असलेला संजय ओरडत असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले. मुलाचे अपहरण करून नेत असल्याचा संशय आल्याने ग्रामस्थांनी वाहनावर दगडफेक केली. या दगडफेकीत वाहनाच्या काचा फुटल्या. त्यानंतर चालकाने वाहन पांढुर्णा दिशेने वळवले. काही अंतरावर गाडीचे दोन्ही पुढील टायर पंचर झाल्याने सर्वजण खाली उतरून पळण्याचा प्रयत्न करू लागले. यावेळी कामठवाडा व पांढुर्णा येथील काही नागरिकांनी त्यांना पकडून काठ्या व हाताने मारहाण केली. या गोंधळात राहुल कांबळे हा पळून गेल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जखमींना ताब्यात घेत उपचारासाठी नेले. या घटनेत रामा जाधव, सौरभ खोपे, अविनाश तायडे, उमेश नायकर, राहुल नेमाडे व विलास नागपुरे हे जखमी झाले असून सर्वांवर उपचार करण्यात आले.

अज्ञात ८ ते १० ग्रामस्थांनी कोणतीही खातरजमा न करता मारहाण केल्याचा आरोप जखमींकडून करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनाश जाधव प्रलय खोबरगड व इतर सहकारी करीत आहे



■ युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गॅसचा तुटवडा होणार असल्याच्या अफवांनी आर्णी शहरात नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या भीतीमुळे अनेक नागरिकांनी गॅस सिलिंडर मिळविण्यासाठी गॅस एजन्सीसमोर गर्दी केली आहे. गरज असो वा नसो, अतिरिक्त सिलिंडर भरून ठेवण्याच्या मानसिकतेमुळे एजन्सीसमोर सकाळपासूनच लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. प्रशासनाकडून जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तरीदेखील सिलिंडरसाठी नागरिकांची झुंबड उडाल्याचे दृश्य शहरात दिसून येत आहे. (छाया : पुनीत मजेठीया)

# तरुणीचा खून; सडलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला

प्रतिनिधी १६ मार्च

**यवतमाळ :** कळंब तालुक्यातील जोडमोहा गावापासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या तासलोट शिवारात एका अज्ञात तरुणीचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चाकूने भोसकून हत्या केल्यानंतर मृतदेह जंगलातील पांदण रस्त्याच्या कडेला टाकण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

रविवारी (१५ मार्च) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास जोडमोहा येथील शेतकरी किशोर राठोड हे शेताकडे जात असताना तासलोट जंगलातील पांदण रस्त्यालगत सडलेल्या अवस्थेत एका तरुणीचा मृतदेह त्यांना दिसून आला. मृतदेह अर्धवट अवस्थेत असून उजवा हात व पायाचे काही भाग कुत्रे किंवा वन्यप्राण्यांनी कुरतडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मृतदेह सडलेल्या अवस्थेत असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली होती. घटनेची माहिती मिळताच किशोर राठोड यांनी तातडीने ११२ वर कॉल करून पोलिसांना कळविले. तसेच देवनाळा येथील पोलीस पाटील विक्रम राठोड यांनीही कळंब पोलीस ठाण्याला माहिती दिली. त्यानंतर कळंब पोलीस ठाण्याचे ठाणेदार राजेश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी फॉरेन्सिक पथकाला पाचारण करून घटनास्थळी पंचनामा केला. घटनास्थळावर बिना मुठीचा चाकू, लाल रंगाची नॅपकिन, आठ नंबरची लेडीज चप्पल, घड्याळ, पुरुषांचा कमरेचा पट्टा तसेच पायपट्टी आढळून आली. तसेच दगडावर सांडलेले रक्तही आढळून आले असून सर्व साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदर मृत तरुणीचे वय अंदाजे २१ वर्षे असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. तिची ओळख अद्याप पटलेली नसून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. कळंब पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.



# गटार योजनेच्या खड्ड्यात शिवसेना पदाधिकाऱ्यांचे आंदोलन

प्रतिनिधी १६ मार्च

**यवतमाळ :** केंद्र व राज्य सरकारच्या सुमारे ३०२ कोटी रुपयांच्या अमृत योजनेचा यवतमाळ शहरात अक्षरशः फज्जा उडाल्याचे चित्र दिसत आहे. आजही शहरातील नागरिकांना पाच ते सहा दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक 21 मध्ये या योजनेअंतर्गत सुरू असलेल्या भूमिगत गटार कामासाठी खोदण्यात आलेल्या खड्ड्यात उतरून शिवसेनेचे शहर उपाध्यक्ष तसेच सामाजिक कार्यकर्ते संजय उपगनलावार यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन केले. या आंदोलनात परिसरातील नागरिकांनीही सहभाग घेत आपला संताप व्यक्त केला.

जीवन प्राधिकरणाने युद्धपातळीवर काम करून अमृत योजनेची कामे पूर्ण करावीत, यासाठी लोकप्रतिनिधींनी वारंवार सूचना दिल्या. तसेच नागरिकांनीही अनेकदा आंदोलनाचा मार्ग अवलंबला; मात्र तरीही ही योजना पूर्णत्वास गेलेली नाही. सन २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असलेली अमृत योजना अद्याप रखडलेलीच आहे. त्यामुळे नागरिकांच्या मनातील नाराजी आणि संताप आज उफाळून आला. दाते कॉलेज रोड परिसरात भूमिगत गटार योजनेसाठी कंत्राटदाराने मोठा खड्डा खोदून ठेवला आहे. जेसीबीच्या कामादरम्यान अनेक पाईपलाईन फुटल्याने शास्त्रीनगर, दहीवलकर प्लॉट, शिवाजीनगर तसेच दाते कॉलेज परिसरातील पाणीपुरवठा पूर्णपणे बंद पडला आहे. आधीच सहा ते सात दिवसाआड पाणीपुरवठा होत असताना अशा अडचणी निर्माण झाल्याने नागरिक हैराण झाले आहे. खोदलेला खड्डा अत्यंत मोठा असल्याने रस्ताही बंद झाला असून नागरिकांना वळसा घालून आपल्या घरी जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याने शिवसेनेचे पदाधिकारी संजय उपगनलावार यांनी पाण्याने भरलेल्या खड्ड्यात उतरून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

जीवन प्राधिकरणाचे अधिकारी उमप यांनी दोन दिवसांत संबंधित ठिकाणचे काम पूर्ण करून खड्डा बुजविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

## तीव्र आंदोलनाचा इशारा

■ दोन दिवसांत खड्डा बुजवून काम पूर्ण करण्यात यावे तसेच फुटलेल्या पाईपलाईनची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशा मागण्या अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेदरम्यान मांडण्यात आल्या आहेत. खड्ड्यात पडून नागरिकांच्या जीवाला धोका उत्पन्न होण्याची शक्यता असल्याने या मागण्या तातडीने पूर्ण करण्यात याव्या अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संजय उपगनलावार यांनी दिला आहे.

> योजनेच्या दिरंगाईने नागरिक हैराण



## विजय सिंगणजुडे यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री यांच्याकडून शोकसंवेदना

प्रतिनिधी १६ मार्च

**यवतमाळ :** यवतमाळच्या हिवरी वनपरिक्षेत्रात लागलेली आग विझवण्याच्या धाडसी प्रयत्नात गंभीर जखमी झालेले वनपाल विजय सिंगणजुडे यांचे निधन झाले, ही अत्यंत दुःखद बातमी आहे. आपल्या जंगलांचे आणि नैसर्गिक संपदेचे रक्षण करताना जीवाची बाजी लावणारे ते खरे वन शहीद आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकसंवेदना व्यक्त केली आहे.

वन शहीद विजय सिंगणजुडे यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन राज्य त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला सदैव कृतज्ञतेने स्मरणात ठेवेल, असेही मुख्यमंत्री यांनी शोकसंदेशात म्हटले आहे.

# देवगाव येथे श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी १६ मार्च

**आर्णी :** तालुक्यातील देवगाव येथे भगवान मुंगसाजी माऊली यांच्या प्रगटदिन सोहळ्यानिमित्त १९ ते २६ मार्चदरम्यान श्रीमद् भागवत संगीतमय जीवनामृत कथा तथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंगसाजी महाराज संस्थान, देवगाव यांच्या वतीने आयोजित या सप्ताहात ह.भ.प. शुभम महाराज कुडवे (पंढरपूर) यांच्या अमृतमय वाणीतून दररोज दुपारी १ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कथा कथन होणार आहे.

आर्णी शहरापासून सुमारे १८ किलोमीटर अंतरावर असलेल्या देवगाव येथे लोकवर्गणीतून २०२१ मध्ये भगवान मुंगसाजी माऊली यांचे भव्य मंदिर उभारण्यात आले. त्यानंतर दरवर्षी श्रीराम नवमीच्या निमित्ताने



मुंगसाजी माऊली यांचा प्रगटदिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीदेखील या निमित्ताने भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहादरम्यान भजन, कीर्तन, हरिपाठ तसेच विविध सामाजिक व समाजप्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ भक्तांनी व श्रोत्यांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# लोकअदालतीत ४२८ प्रकरणांचा निपटारा; १,२४४ प्रकरणे तडजोडीसाठीठेवली

## दोन विभक्त जोडपी एकत्र; दोन विभक्त जोडपी एकत्र

प्रतिनिधी १६ मार्च

**घाटंजी :** घाटंजी तालुका विधी सेवा समिती आणि दिवाणी न्यायालय यांच्या संयुक्त विद्यमाने १४ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीत तडजोडीसाठी ठेवण्यात आलेल्या १,२४४ प्रकरणांपैकी ४२८ प्रकरणांचा दोन्ही पक्षांच्या सहमतीने निपटारा करण्यात आला.

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी आणि घाटंजी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष न्यायाधीश प्रविण आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. दिवाणी व फौजदारी



न्यायालयातील लोकअदालती हे प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रभावी माध्यम ठरत असल्याचे मत न्यायाधीश प्रविण पाटील यांनी व्यक्त केले. या लोकअदालतीत घाटंजी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात प्रलंबित असलेली २११ प्रकरणे तसेच वादपूर्व स्तरावरील २१७ प्रकरणे अशा एकूण ४२८ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या प्रक्रियेतून एकूण ४ लाख ७९ हजार १०० रुपयांची तडजोड रक्कम वसूल करण्यात आली. दरम्यान, कौटुंबिक सलोखा राखण्याच्या दृष्टीने अनेक वर्षांपासून विभक्त राहिलेली दोन जोडपी पुन्हा एकत्र आली. न्यायालयाच्या आणि वकिलांच्या मध्यस्थीमुळे मंदा शेंडे विरुद्ध किशोर शेंडे तसेच ममता बोंडे विरुद्ध रवींद्र बोंडे या प्रकरणांमध्ये पती-पत्नीने आपापसातील मतभेद विसरून पुन्हा एकत्र नांदण्याचा निर्णय घेतला. या लोकअदालतीत पॅनेलवर नियुक्त अँड. शुभम धुमाळ, तालुका वकील संघाच्या अध्यक्षा नीता मनोज राठोड, सचिव वैभव महाजन यांच्यासह इतर वकील उपस्थित होते. तसेच न्यायालयाचे सहाय्यक अधीक्षक अलोणी, स्टेनो सूर्यवंशी, लिपिक डोईजड, माळवी, कनिष्ठ लिपिक राहुल बनारसे, विजय गवारे, शिवरकर बेलीफ, शिपाई लखन आडे, वासनिक, विक्रांत उइके तसेच MSF जवान वाल्मीक राठोड, तडवी, चव्हाण, साईनाथ पवार, आकाश, सिंधु आणि इतर कर्मचारी, विविध बँकांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने पक्षकार उपस्थित होते.

# माणसाने माणूस जोडला तरच समाज जुळेल : नौशाद उस्मान

## इफ्तार मेजवानीत सामाजिक सलोख्याचा संदेश!

प्रतिनिधी १६ मार्च

**उमरखेड :** पवित्र रमजान महिन्यानिमित्त जमाअते इस्लामी हिंद, शाखा उमरखेड यांच्या वतीने शहरातील अनंतराव देवसरकर मंगल कार्यालय, ढाणकी रोड येथे इफ्तार मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विविध धर्म, जाती व सामाजिक संघटनांचे मान्यवर उपस्थित राहून सामाजिक सलोख्याचा सुंदर संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध इस्लामिक विचारवंत जनाब नौशाद उस्मान (छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, धार्मिक माणूस कधी कट्टर पंथीय नसतो. समाजात अधार्मिकता वाढवण्याचे काम काही राजकीय लोकांकडून केले जाते. पृथ्वीवरील सर्व धर्म, त्यांच्या रूढी, परंपरा व चालीरीती या आदरणीय असून प्रत्येक धर्माचा आदर करणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, पूर्वीचे लोक माणसं वाचत होते आणि माणूस ओळखत होते, त्यामुळे समाजात माणुसकी टिकून होती. आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे माणसं जवळ आली असली तरी माणुसकी मात्र दूर जाताना दिसत आहे.रमजान महिन्यातील रोजाबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, रोजा हा केवळ उपवास नसून तो आत्मशुद्धी, संयम आणि समाजात एकोपा निर्माण करणारी चळवळ आहे. जगातील अनेक समाजांमध्ये उपवासाची परंपरा आहे. माणसाला माणसाशी जोडणारी संस्कृती म्हणजेच रोजा किंवा उपवास होय.

रोजा उपवास ईश्वराचे सानिध्य प्राप्त करण्याचे साधन होय ,रमजान चारित्र संवर्धनाचा महिना आहे, उपवासात मानवी विचार प्रवण होतात. नैतीक बळ म्हणजे इशपारायणता असे विचार नौशाद यांनी व्यक्त केले .

उमरखेडसारख्या शहरात विविध धर्मीय नागरिक , राजकीय व्यक्ती , सर्व क्षेत्रातील मान्यवर एकत्र येतात हा उमरखेड पॅटर्न देशभर राबविल्या जाण्याची गरज असल्याचे नौशाद म्हणाले .माणसाला माणूस जोडला तर समाज जोडेल, समाज जोडला तर गाव जोडेल आणि गाव जोडले तर राष्ट्र मजबूत होईल, असा संदेशही त्यांनी दिला. या इफ्तार मेजवानी कार्यक्रमाला शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विविध जाती-धर्माचे नागरिक, डॉक्टर असोसिएशन, पोलीस प्रशासन, पत्रकार संघटना, वृक्ष संवर्धन समिती तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि ऐक्याचा संदेश देण्यात आला. सात वेगवेगळ्या भाषांत इस्लामविषयी गैरसमज दूर करण्यासाठी इस्लामिक इन्फॉर्मेशन सेंटर (IIC) च्या 1800 572 3000 या टोलफ्री नंबरचा त्यांनी परिचयदेखील यावेळी करून दिला.

शेवटी जमाअतचे स्थानिक अध्यक्ष ज़हिरुद्दीन क़ाज़ी यांनी आभार मानले, तर फिरोज़ अंसारी यांनी सुत्रसंचलन केले. या कार्यक्रमात इफ्तारच्या फराळासहीत मोफत मराठी साहित्याचीही मेजवाणीही भेट म्हणून श्रोत्यांना दिली.

कार्यक्रमाला शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विविध जाती-धर्माचे नागरिक, डॉक्टर असोसिएशन, पोलीस प्रशासन, पत्रकार संघटना, वृक्ष संवर्धन समिती तसेच अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. १६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




सिटी न्यूज वाशीम
शिक्षण अधिकाऱ्यांनी मांगितली ५० हजाराची लाच...
द्या दाम तरच काम, भ्रष्टाचारी त्यांचे नाम!
सिटी न्यूज वाशीम
जिल्ह्यातील शिक्षकांचे होतंय मरण...
एकीकडे राजकारण, दुसरीकडे अधिकाऱ्यांचे भ्रष्टधोरण!

# सरस्वतीच्या कार्यालयात लक्ष्मीदर्शन मोक्यात, शिक्षण विभागाचे 'पावित्र्य' धोक्यात !

## अनेक दलालाकडे 'वसूली' चे कंत्राट* संस्थाचालक, मुख्याध्यापकासह कर्मचारी हतबल...

● सिटी न्युज ब्यूरो @ वाशीम ●

वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागातील सुरू असलेल्या भ्रष्ट कारभाराला जिल्ह्यातील शिक्षण संस्थाचालक, अमरावती विभागाचे शिक्षक आमदार, मुख्याध्यापकांसह सर्व कर्मचारी वैतागल्याची शिक्षण क्षेत्रात चर्चा आहे. माध्यमिक शिक्षण विभागाच्या महिला अधिकाऱ्यासमोर सर्वच 'हतबल' झाले असून सरस्वतीच्या कार्यालयात खुलेआम सुरू असलेल्या लक्ष्मीदर्शनामुळे शिक्षण क्षेत्राचे 'पावित्र्य' धोक्यात आल्याची जिल्हाभरात चर्चा आहे. ते आता शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांनी व्हायरल केलेल्या व्हिडीओ वरून सिध्द झाले आहे. या व्हिडीओत शिक्षणाधिकाऱ्यानी शिक्षकाला ५० हजार रूपयाची लाच मांगतल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे एकीकडे राजकारणाचा आरोप होत आहे तर दुसरीकडे अधिकाऱ्याचे भ्रष्टधोरण कायम सुरूच आहे. त्यामध्ये मात्र, शिक्षकांचे मरण होत आहे.

वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागात विदर्भातील एका कॅबिनेट मंत्र्याच्या कृपादृष्टीने एका महिला अधिकाऱ्याची माध्यमिक शिक्षणा धिकारी म्हणून नियुक्ती मिळाली. 'या' कृपादृष्टीमुळे महिला अधिकाऱ्याने चक्क 'महसूल' जमा करण्याचे एकमेव उद्दीष्ट ठेवले असून विविध कामासाठी 'रेटकार्ड' ठरवून त्यांची मर्जी संपादन करणाऱ्या खास लोकांची दलालाची नियुक्ती वसूलीसाठी केल्याची बाब निदर्शनास आली आहे. उल्लेखनिय बाब म्हणजे वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळे दलाल असल्यामुळे दररोज 'या' कार्यालयात 'लक्ष्मी' प्राप्त झाल्यावरच संबंधित कागदावर, पत्रावर, आदेशावर 'त्या' महिला अधिकाऱ्याची स्वाक्षरी होत असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. खास वसूलीसाठी दलाली करणारे ४ ते ५ दलाल असून ते आपल्या जवळच्या शिक्षकांना त्रास देत आहेत. ज्या दलालाकडे स्वत:चे चारचाकी वाहन असून ते सर्व दलाल दररोज महिला अधिकाऱ्याला 'सावज' शोधून देण्याचे आणि त्या सावजाकडून वसूली करण्याचे कार्य अविरतपणे करत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. हा प्रकार करण्यासाठी त्याला त्याच्या गाडीचे भाडे व मोठ्या प्रमाणात दलाली मिळत असल्याने महिला अधिकाऱ्यासह दलाल ही मालामाल झाल्याची शिक्षण क्षेत्रात चविने चर्चा सुरू आहे. यापुर्वी एवढा खादाड अधिकारी माध्यमिक शिक्षण विभागामध्ये आला नसल्याची उपरोधिक टीका अनेक त्रस्त लोक करत असून माध्यमिक शिक्षण विभागातील खुलेआम सुरू असलेला लक्ष्मीदर्शनाचा प्रकार बंद करण्यासाठी शिक्षक संघटनांनी पुढाकार घ्यावी, अशी शिक्षकांची मागणी आहे.

### भरती घोटाळ्याचा २०१४ पासून सिटी न्युज सुपरफास्टचा पाठपुरावा...


#### दोन शिक्षण अधिकारी निलंबीत, अनेक शाळांवर गुन्हे दाखल

वाशीम जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बोगस भरतीची चौकशी नोव्हेंबर २०१४ मध्ये करुन वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील पाचशेच्या जवळपास बोगस भरतीची यादी तयार केली होती. तत्कालीन शिक्षणाधिकारी लबडे व तेलगोटे यांना अकोला येथील एका प्रतिष्ठीत हॉटेलमध्ये ३१ डिसेंबर २०१४ च्या रात्री बोलावून वाशीम जिल्ह्यातील बोगसभरती प्रकरण रफादफा करण्यासाठी चक्क 'एक खोक्याची' मागणी केली होती, पण त्या दोन्ही 'धुर्त' अधिकाऱ्यांनी पवार यांची खोक्याची मागणी फेटाळून पावारांनाच चॅलेंज केले. नंतर संतापलेल्या पवारांनी वाशीम जिल्ह्यातील अनसिंग, आसेगाव, मंगरूळपिर, कारंजा ग्रामिण पोलीस ठाण्यात बोगसभरती केलेल्या संस्थाचालक, कर्मचारी आणि लबडे, तेलगोटे या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले असल्याचीही शिक्षणक्षेत्रात चर्चा आहे. या प्रकरणी सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. काही शाळांनी तर खोटे वृत्त छापल्यामुळे सिटी न्युज सुपरफास्टवरच गुन्हे दाखल केले आहेत.






शिक्षक नेत्या डॉ. सौ. संगीता शिंदे (बोंडे) यांनी त्यांच्या फेसबुकवर शिक्षणधिकाऱ्यांनी ५० हजाराची लाच मांगितल्याचा व्हिडीओ व्हायरल केला व शिक्षणधिकाऱ्यांना धारेवर धरले. यावरून शिक्षण विभागात दाम दिल्याशिवाय काम होत नसल्याचे सिध्द झाले आहे.



### श्रेयवादाचे राजकारण, अधिकाऱ्यांचे भ्रष्टधोरण...

वाशीम जिल्ह्यात शिक्षकांच्या अनेक संघटना आहेत. सोबतच अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरणराव सरनाईक हे सुद्धा वाशीमचेच आहेत. तसेच शिक्षक आमदार संस्थानिक असल्यामुळे आणि त्यांना पुन्हा शिक्षक आमदार होण्याची सुप्त ईच्छा असल्यामुळे त्यांनी वाशीम जिल्ह्यातील शिक्षकांसह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज होती. शिक्षक संघटना आणि शिक्षक आमदारांच्या मौनव्रतामुळे भ्रष्ट अधिकाऱ्यांनी खुलेआम भ्रष्टाचार सुरू केल्याचा आरोप विविध स्तरातून आरोप केल्या जात आहे. आता शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदे यांच्या व्हायरल व्हिडीओवरून श्रेयवादाचे राजकारण सुरू असून अधिकाऱ्यांच्या भ्रष्टधोरणाबाबत शिक्षक संघटनांनी आतापर्यंत मौनव्रत का बरे साधले आहे. अशी चर्चा ही होत आहे. विमाशीच्या मते आम्ही यापूर्वीच या अन्यग्रस्त शिक्षकाला मदत केल्याचे बाळासाहेब गोटे यांनी सांगितले तर अन्यायग्रस्त शिक्षकाने न्यायासाठी शिक्षक नेत्या डॉ. संगीता शिंदेकडे पाठपुरावा केल्याचे सांगितले.

## थोडक्यात

### चिखली येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

महसूल व वन विभागाच्या वतीने सर्व सामान्य नागरिकापर्यंत, शासकीय सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. शिबिराचे आयोजन २० मार्च रोजी करण्यात आले असल्याची माहिती तहसील कार्यालयाने प्रसिद्ध पत्राद्वारे दिली आहे. सदरील शिबिर शुक्रवार २० मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता कवठा महसूल मंडळासाठी - खंडोबा मंदिर चिखली येथे होणार आहे. या शिबिरामध्ये महसूल विभागाशी संबंधित १५ पेक्षा जास्त सेवांचे एकाच ठिकाणी निराकरण केले जाणार आहे. रहिवाशी उत्पन्न आणि नॉन क्रिमिनल प्रमाणपत्रे मिळविणे, पी.एम. किसान योजनेचे नवीन अर्ज, प्रलंबित फेरफार, सातबारा मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ आणि ८-अ उताऱ्याचे वाटप, अकृषिक ँ) तरतुदी बाबत मार्गदर्शन व सुधारणा, नवीन व्यवस्थापनानुसार सनद, प्रक्रिया ची माहिती, सामाजिक अर्थसाह्य योजनेचे लाभ मंजूर करणे, कवठा सर्कल मधील संबंधित गावातील नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या महसूल विषयाच्या तक्रारीचे निवारण करून घ्यावे, असे आव्हान मंडळ अधिकारी गजानन गरकळ व महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मोठ्या गावात अतिरिक्त रेशन दुकान का नाही 'वाटे'...

# पुरवठा विभागाचे डिलरसोबत 'साटे-लोटे' !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**महाराष्ट्र शासनाने मोठ्या लोकसंख्या असलेल्या गावात रेशन कार्ड ची संख्या लक्षात घेता त्या गावात एकापेक्षा दुसरे दुकान उघडण्याची परवानगी निर्देश तालुका जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना दिलेले आहेत परंतु जुन्या रेशन दुकानाचे आर्थिक साठे लोटे जिल्हा तालुका पुरवठा अधिकाऱ्यांशी असल्यामुळे अनेक गावातील ऑडिओ लोकसंख्या व रेशन करण्याची संचा लक्षात घेता इथे अतिरिक्त दुकाने अद्याप दिलेली नाहीत याला सर्वस्वी जबाबदार व तालुका पुरवठा अधिकारी असून यांनी आतापर्यंत हलगर्जीपणाच्या नावाखाली वेळ काढून आकल्याने याचा फायदा संबंधित मोठ्या गावातील कंट्रोल डीलर धारकांना होत आहे.**



निर्णय त्यांच्या विरोधात जाऊ नये म्हणून व एकापेक्षा दुसरे दुकान गावात होऊ नये म्हणून आर्थिक रसात पुरून तालुका व जिल्ह्यातील पुरवठा अधिकाऱ्यांना हाताशी घ एकापेक्षा दुसरे दुकान देण्याचा अहवाल शासनाकडे गेल्या अनेक वर्षांपासून गेलेला नाही. जिल्ह्यातील तालुक्यातील सर्व रेकॉर्ड तेथील लोकसंख्या व रेशन कार्ड ची संख्या तालुका पुरवठा अधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना माहीत असताना निवांत बसणारा गावात एकापेक्षा दुसरे दुकान देण्याची शिफारस शासनाकडे का केल्या गेली नाही? याची सुद्धा चौकशी होणे गरजेचे आहे. अजून यांना काही प्रश्न विचारले ची उत्तरा सर्व उडवा ओळीची देतात. सदर वाडीव दुकानाचे अहवाल शासनाकडे पाठवण्याची जबाबदारी तालुका पुरवठा अधिकारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्यावर असताना कशातून दोनच वेळा हे अहवाल पाठवण्याची संधी वा जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांच्या असताना अद्याप तसे का घडले नाही याची सुद्धा चौकशी करणे अपेक्षित आहे. मातब्बर असलेले जुने जाणते रेशन दुकानदार यांना अधिकाऱ्यांच्या सर्व आर्थिक नाऱ्या माहीत असल्याकारणाने आर्थिक रसात पुरून आपल्या दुकानावर कोणताही परिणाम होऊ नये म्हणून या अधिकाऱ्यांना आर्थिक पुरवठा करून सदर अहवाल अद्याप या जिल्ह्यातून गेले का गेले नाहीत याचे सुद्धा चौकशी होणे अपेक्षित आहे.

संबंधित अधिकारी रो सामान्याच्या जीवाशी का खेळतात याचा अध्यापन उत्तर प्रशासना लावा नागरिकांना मिळालेला नाही. यात मोठे होत असलेले रेशन घोटाळे आणि प्रचंड प्रमाणात बाहेर वाहतूक होत असलेला गहू व तांदूळ पकडून दिल्यानंतर हे नक्की हा मङङ कोणाचा आहे व कोणाच्या मार्गदर्शनाखाली बाहेर जात आहे याचा अध्यापन उत्तर पुरवठा विभागाला मिळालेला नसल्याचे दिसते याच्या मागील एकमेव कारण आहे ते अर्थ कारण राज्यातील सर्व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या व तालुका पूर्ण अधिकाऱ्यांच्या ँ च्या माध्यमातून चौकशी जर लावल्या हे प्रकरण सुद्धा ईडी शिवाय कडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण या प्रकरणात अमाप पैसा कमवण्याचे समोर येते. तसेही भ्रष्टाचाराच्या प्रकरणात महसूल विभाग अव्वल असल्याचे लाचलुसवत प्रतिबंधात्मक विभागाच्या माध्यमातून होत असलेल्या कारवाई व त्यातून अव्वल असलेले विभाग त्यामध्ये पुरवठा विभागाचा सुद्धा प्रथम क्रमांक त्याच्या लक्षात ये म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना विनंती की शासनाचा पगार घेऊन शासनाच्या निर्णयाविरोधात केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी व डिलांच्या भल्यासाठी शासनाच्या आणि जनतेची बेमानी करणाऱ्यांना यांच्या चौकशी एसीबीच्या माध्यमातून कोणी आवश्यक आहे.

## बातमी खास, दखल हमखास, सिटी न्यूज सुपरफास्ट...

# कुकसा फाटा-मांगुळ झनक मार्गाचे काम पुन्हा सुरू !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

कुकसा फाटा-मांगुळ झनक (नेतंसा) या महत्त्वाच्या मार्गावरील निकृष्ट दुरुस्तीबाबत सिटी न्यूज सुपरफास्टने २५ फेब्रुवारी बुधवार रोजी प्रकाशित केलेल्या वृत्ताची अखेर प्रशासनाने दखल घेतली आहे. वृत्त प्रसिद्ध होताच संबंधित विभागाने तातडीने हालचाल करत या मार्गावरील कामाचा आढावा घेतला असून रस्त्यावर पुन्हा डांबरीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक, शेतकरी व वाहनधारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

केनवडहून कुकसा फाटा मार्गे मांगुळ झनक (नेतंसा) या गावाकडे जाणारा हा मार्ग परिसरातील दळणवळणाचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला जातो. तहसील कार्यालय, पंचायत समिती, बाजारपेठ तसेच विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना या मार्गावरूनच प्रवास करावा लागतो. अनेक विद्यार्थीही शिक्षणासाठी या रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे या मार्गाची स्थिती चांगली असणे अत्यंत आवश्यक आहे.

मात्र काही दिवसांपूर्वी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना प्रत्यक्षात केवळ धातू-मातूर स्वरूपाचे काम होत असल्याची बाब समोर आली होती. रस्त्यावर फक्त खडी टाकून दाब देण्याचे काम होत असल्याने ही दुरुस्ती तात्पुरती ठरणार असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली होती. त्यामुळे परिसरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या संदर्भात सिटी न्यूज सुपरफास्टने सविस्तर वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. दरम्यान, यावर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे कांचन–ऊतावळी नदीला मोठा महापूर आला होता. त्या महापुराच्या पाण्यामुळे कुकसा फाटा–अंचळ या गावादरम्यान रस्त्याच्या साईड कडा मोठ्या प्रमाणात खचून गेल्या होत्या. अनेक ठिकाणी तब्बल दहा-दहा फूट खोल दरीसारखे खड्डे निर्माण झाले होते. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना वाहनधारकांना मोठा धोका निर्माण झाला होता. काही ठिकाणी रस्ता अरुंद झाला असून बाजूला कोणतीही ठोस संरक्षण व्यवस्था नव्हती.





### डांबरीकरण; खचलेल्या कडांवर मुरूम भराई


सिटी न्यूज वाशीम
अधिकारी व ठेकेदार चतूर, रस्त्याची दुरुस्ती थातूर-मातूर!

या गंभीर परिस्थितीचीही सिटी न्यूज सुपरफास्टने आपल्या दैनिकातून दखल घेत सविस्तर वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्तामुळे प्रशासन व संबंधित यंत्रणा जागी झाली. त्यानंतर या मार्गाची पाहणी करून आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्यात आली आहेत.

सध्या या मार्गावर पुन्हा डांबरीकरणाचे काम सुरू करण्यात आले असून खचलेल्या साईड कडा मुरूम टाकून भरण्याचे कामही सुरू आहे. काही ठिकाणी रस्त्याच्या कडांना मजबुती देण्यासाठी अतिरिक्त भराव टाकण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भविष्यात रस्त्याला होणारा धोका कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र या कामासोबतच रस्त्याच्या साईड कडांचे भक्कम मजबुतीकरण करणे, पुलांवर सुरक्षाकठडे बसविणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी दिशा व सूचना फलक उभारणे गरजेचे असल्याची मागणी ग्रामस्थ व वाहनधारकांकडून होत आहे. सध्या सुरू असलेले काम दर्जेदार व कायमस्वरूपी व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. परिसरातील नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम सिटी न्यूज सुपरफास्ट सातत्याने करत असून या वृत्ताची प्रशासनाने घेतलेली तातडीची दखल पाहता स्थानिक नागरिकांकडून या वृत्तपत्राचे कौतुक केले जात आहे.

### य.च.महाविद्यालय व बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने

# शेतकरी प्रबोधन कार्यशाळा

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर यांच्या वतीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत कार्यरत डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र, अमरावती तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरुळपीर यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी 'शेतकरी प्रबोधन कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. १८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता सांस्कृतिक सभागृहात, वाशीम रोड, मंगरुळपीर येथे आयोजित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुभाषराव ठाकरे (माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. महेंद्र ढोरे (प्र-कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) यांच्या शुभहस्ते होणार आहे. तसेच कार्यक्रमास चंद्रकांत ठाकरे (मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद वाशीम तथा सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरुळपीर) व राम ठाकरे (सदस्य, कार्यकारी परिषद, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सुधीर जगताप (प्रगती ॲग्रो एंटरप्रायजेस, अमरावती) हे 'शेती समोरील आव्हाने' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच डॉ. योगेश इंगळे (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) हे 'संत्रा पिकाविषयी मार्गदर्शन' करणार असून डॉ. व्ही. व्ही. गौड (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) हे 'तण नियंत्रण मार्गदर्शन' या विषयावर माहिती देणार आहेत. याशिवाय डॉ. विजयकुमार गावंडे (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला) हे 'तूर पिकाविषयी मार्गदर्शन' करणार आहेत.

या कार्यशाळेला परिसरातील सर्व शेतकरी, कृषी क्षेत्राशी संबंधित व्यक्तीनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक डॉ. महेंद्र मेटे संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थव्यवस्था नियमन केंद्र, अमरावती, डॉ. राहुल सुर्वे प्राचार्य, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर) आणि गणेश शर्मा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. १६ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# हॉटेलमध्ये परत चूल व भट्टयांना आले अच्छे दिन

प्रतिनिधी १६ मार्च

■ गॅस मिळत नसल्याने हॉटेल व खानावळ व्यावसायिक वळले भट्टयांकडे

**अकोला :** युद्ध परिस्थितीमुळे गॅस पुरवठा साखळी अडचणीत आली आहे. याचा सर्वाधिक फटका शहरातील उद्योगांसह खाद्यपदार्थ व्यवसायालाही बसला आहे. शहरात व्यावसायिक वापराच्या सिलिंडरचा पुरवठा पूर्ण बंद आहे.

त्यामुळे हॉटेल व्यवसायाच





'गॅस'वर आल्याची स्थिती आहे. अशा स्थितीतही व्यवसाय सुरू ठेवण्यासाठी अनेक हॉटेलमालकांनी चूल आणि कोळशावरील शेगड्यांचा वापर सुरू केला आहे. अमेरिका-इस्त्राईल आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने व्यावसायिक वापराच्या 'एलपीजी सिलिंडर' पुरवठ्यावर निर्बंध आणले. त्यामुळे काही दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने शहरातील अनेक मोठे हॉटेल व्यावसायिक हतबल झाले आहेत. त्यावर तोडगा म्हणून नागरिक आणि हॉटेल व्यावसायिकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करणे सुरू केले आहे काही व्यावसायिकांनी हॉटेलमध्ये सिमेंटची भट्टी तयार केली आहे. काही ठिकाणी चुलीवर स्वयंपाक करण्यात येत आहे. यातून ग्राहक टिकवण्यासाठी हॉटेल व्यावसायिकांनी धडपड सुरू केली आहे. व्यावसायिक सिलिंडर मिळत नसल्याने हॉटेल बंद ठेवण्याची नामुष्की आली आहे. मात्र काही हॉटेल व्यावसायिकांनी हार न मानता त्यातूनही शक्कल लढवली आहे. गॅस नसल्यावर हॉटेल बंद ठेवण्यापेक्षा चुल व भट्टिचा पर्याय अनेकांनी स्वीकारला आहे. अनेक हॉटेलमध्ये अन्न शिजवण्यासाठी पहिल्यांदाच चूल पेटली आहे.

### वापराला मर्यादा, अनेक पदार्थ मेनूतून गायब

चूल आणि इलेक्ट्रिक शेगड्यांच्या वापराला मर्यादा असल्याने हॉटेलच्या मेन्यू कार्डवरील अनेक पदार्थ सध्या गायब झाले आहेत. चुलीवर सर्व पदार्थ तयार करणे शक्य नसल्याने मोजकीच ऑर्डर स्वीकारत आहोत. गॅस मिळणार की नाही, याबाबत प्रशासनाकडून अधिकृत सूचना नसल्याने व्यावसायिकांमध्ये संभ्रम असून चिंता वाढल्याचे शहरातील अनुपम भोजनालयाच्या मालकाने सांगितले.

# दरोड्यापूर्वीच गुन्हेगारी टोळी जेरबंद

प्रतिनिधी १६ मार्च

♦ स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई



**अकोला :** नंबर प्लेट बदलून महिंद्रा एक्सयूव्ही कारमधून दरोड्याच्या उद्देशाने जाणाऱ्या तीन कुख्यात आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. कारवाईदरम्यान त्यांचे दोन साथीदार फरार झाले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. या सर्व आरोपींवर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

महिंद्रा एक्सयूव्ही गाडीची नंबर प्लेट बदलून काही संशयास्पद आरोपी वाशिम बायपास परिसरातून दरोड्याच्या उद्देशाने जात असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून अचानक कारवाई केली आणि तीन आरोपींना ताब्यात घेतले, तर दोन आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

आरोपी आणि गाडीची झडती घेतली असता, पोलिसांना गाडीत एक देशी बनावटीचे रिव्हॉल्व्हर आणि दोन जिवंत काडतुसे, एक मोठा चाकू आणि लोखंडी करवत, चेहरा झाकण्यासाठी मास्क आणि हातमोजे, तीन मोबाईल फोन आणि गाडीच्या बनावट नंबर प्लेट्स, एक महिंद्रा एक्सयूव्ही ५०० कार आढळली.

पोलिसांनी एकूण १० लाख ५९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक करण्यात आलेले आरोपी निहाल अहमद फिरोज अहमद रा. अल करीमनगर, अमरावती, सय्यद अली सय्यद अनीस रा. जमजम नगर, खामगाव, शेख इलियास शेख अयाज रा. देशपांडे प्लॉट, जुने शहर, अकोला व फरार आरोपी जुनैद रा. अमरावती आणि एक अनोळखी साथीदार.

आरोपींची पार्श्वभूमी तपासली असता, ते अनेक मोठ्या गुन्ह्यांत सामील असल्याचे समोर आले आहे. मलकापूर येथील एका व्यापाऱ्याचे २० लाख रुपयांसाठी या टोळीने अपहरण केले होते. तसेच, आरोपी शेख इलियास याच्यावर यापूर्वी एमपीडीए अंतर्गत कारवाई होऊन तो एक वर्ष तुरुंगात होता. या सर्वांवर अपहरण, खंडणी, हत्येचा प्रयत्न, चोरी, दरोडा, दंगल आणि बेकायदेशीर शस्त्र बाळगल्याचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपींच्या हालचाली आणि त्यांच्याकडे सापडलेली शस्त्रे पाहता, ते अकोल्यात मोठी घटना घडवण्याच्या तयारीत होते. मात्र, स्थानिक गुन्हे शाखेच्या तत्परतेमुळे हा मोठा अनर्थ टळला. सध्या जुने शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके व त्यांच्या पथकाने केली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या सेंट्रींगला शॉर्टसर्किटमुळे आग, अंदाजे 15 लाखांचे नुकसान

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला :** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधन भवनाच्या बाजूला असलेल्या लाकडी सेंट्रींग गंजिला शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागल्याची घटना रविवारी घडली. या आगीत अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिष्ठानच्या लाकडी सेंट्रींग वरून गेलेल्या विद्युत तारांना झाडाच्या घर्षणामुळे अचानक शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली. सुरुवातीला धूर निघत असल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र काही वेळातच आगीने रौद्र रूप धारण केल्याने अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अथक प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. आगीमुळे सेंट्रींग साहित्य जळून खाक झाले आहे. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी



झाली नाही मात्र आगीमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. अशा दुर्घटना टाळण्यासाठी विद्युत सुरक्षेकडे अधिक लक्ष देण्याची गरज असल्याचे मत प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. मुकुंद भारसाकळे यांनी व्यक्त केले आहे.

# विद्यानगर परिसरात 'स्काय ईव्ही' इलेक्ट्रिक स्कूटर शोरूमचे उद्घाटन

## गुढीपाडव्या निमित्त ऑफर

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला :** स्थानिक विद्यानगरात जुन्या पारस्कर शोरूमसमोर आणि शिवशक्ती मेडिकलजवळ टेकडीवाल परिवारातर्फे 'स्काय ईव्ही' इलेक्ट्रिक वाहन शोरूमचा शुभारंभ करण्यात आला.

'स्काय सोल्यूशन प्रा. लि. मुंबई' द्वारे उत्पादित स्काय ईव्ही इलेक्ट्रिक वाहनांमध्ये खालील आकर्षक मॉडेल्स उपलब्ध आहेत. दुचाकी स्काय ईव्ही एसएल, स्काय ईव्ही डीएल, स्काय ईव्ही एक्टिव्ह, लोडर दुचाकी स्काय ईव्ही बिजली, लोडर तिचाकी स्काय ईव्ही इग्नाइट मॉडेल उपलब्ध आहे. गुढीपाडव्यानिमित्त




ऑफर असून १९ मार्च पर्यंत कोणत्याही ई-वाहन खरेदीवर ५,००० रुपयांची आकर्षक सवलत दिली जात आहे. वाहन खरेदीसाठी वाशिम अर्बन बँकेतर्फे फायनान्स देखील उपलब्ध करून दिले जात आहे. या शोरूमचे उद्घाटन रविवारी रमेश टेकडीवाल, कमल टेकडीवाल, अशोक टेकडीवाल, रवींद्र टेकडीवाल, गोपाल टेकडीवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक कपिल बोकाडिया, महाराष्ट्र विक्री अधिकारी अभिजित प्रमाणिक, विक्री प्रतिनिधी मनीष दुबे, हेमंत संघवी आणि मिलन भिमाणी उपस्थित होते. पंडित आनंदकंद महाराज यांनी वैदिक मंत्रोच्चारात हा सोहळा संपन्न केला. शोरूमच्या संचालिका सपना सुशील टेकडीवाल आणि संचालक सुशील टेकडीवाल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी सुशील टेकडीवाल यांनी या इलेक्ट्रिक वाहनांच्या उपयुक्ततेवर प्रकाश टाकत ही वाहने अत्यंत परवडणाऱ्या दरात उपलब्ध असल्याचे सांगितले.

# रमेश बयस यांचा मृतदेह सापडला

प्रतिनिधी १६ मार्च

**मूर्तिजापूर :** बेपत्ता रमेश बयस विहिरीत मृतावस्थेत सापडला अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर शहरात बेपत्ता झालेल्या व्यक्तीचा मृतदेह विहिरीत आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ११ मार्च रोजी घरातून बाहेर पडलेले रमेश गोकुलसिंग बयस (रा. मूर्तिजापूर) यांचा मृतदेह १५ मार्च रोजी सायंकाळी सोनोरी रोडवरील शाळेसमोर असलेल्या राजपूत यांच्या शेतातील विहिरीत तरंगताना आढळून आला.

मिळालेल्या माहितीनुसार, रमेश बयस हे ११ मार्च रोजी घरातून बाहेर पडले होते. मात्र त्यानंतर ते घरी परतले नाहीत. कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला, तसेच स्थानिक नागरिक आणि पोलिसांच्या मदतीने परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली. तरीही त्यांच्या ठावठिकाण्याबाबत कोणतीही ठोस माहिती मिळाली नव्हती. दरम्यान, १५ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास सोनोरी रोडवरील शाळेसमोर असलेल्या राजपूत यांच्या शेतातील विहिरीत एक मृतदेह उलट्या अवस्थेत तरंगताना काही नागरिकांच्या निदर्शनास आला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.घटनास्थळी पाहणी केली असता विहिरीजवळ चप्पल, तंबाखूची पुडी आणि चष्मा आढळून आला. या वस्तूंवरून मृतदेह रमेश बयस यांचाच असावा असा संशय व्यक्त करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच जय गजानन आपत्कालीन पथक, मूर्तिजापूर शहर पोलीस तसेच फॉरेन्सिक पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आपत्कालीन पथकाच्या मदतीने विहिरीतून मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर कुटुंबीयांनी मृतदेहाची ओळख पटवली असता तो रमेश गोकुलसिंग बयस यांचाच असल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे परिसरात भीती व चर्चेचे वातावरण निर्माण झाले असून, मृत्यूचे नेमके कारण काय याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. दरम्यान, पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी पाठवला असून, या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

# शहरातील हँडपंप बनले शोभेच्या वस्तू

♦ महापालिकेची जबाबदारी नाही का?

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला :** शहरात ४१,४२ अंश सेल्सिअस तापमान सध्या आहे. शहराच्या काही भागात अनियमित पाणी पुरवठा असल्याने लोकांना पाण्यासाठी परिश्रम घ्यावे लागत आहेत. पाणी पुरवठा आराखडा अंमलात आणताना बंद पडलेल्या हातपंपाकडे देखील लक्ष द्यावे. जेणेकरून त्या भागातील लोकांना पाणी उपलब्ध होऊ शकेल. अकोला शहरातील अनेक भागातील हातपंप बंद पडलेले दिसतात. महानगरपालिका जलप्रदाय विभागाला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही की जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते हा संशोधनाचा विषय झाला आहे. परंतु या गोंधळात नागरिकांची मात्र ससेहोलपट होत आहे. उन्हाळ्यात तरी पाणी पुरवठा सुरळीत राहील तसेच विविध स्त्रोतातून नागरिकांना पाणी पुरवठा होईल यास प्राधान्य देण्याची गरज आहे. महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.



# रतनलाल प्लॉट चौकात वाहतूक विस्कळीत

प्रतिनिधी १६ मार्च

♦ सिग्नल बंद असल्याने बेशिस्तीचे प्रदर्शन

**अकोला :** शहरातील महत्त्वाच्या चौकात सिग्नल सुरू राहिले तर ठीक. आणि त्यातही वाहतूक पोलिस ड्युटीवर असले तरच शिस्त राहते. नाही तर सिग्नल तोडून जायला काही महाभाग मागेपुढे पाहत नाहीत. काही ऑटो चालक, दुचाकी चालक बहादुरी दाखवल्याच्या तो-यात वाहने नेतात. आणि आज तर रतनलाल प्लॉट चौकात सिग्नल बंद होते. त्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली.

भर चौकात एखादे वाहन जरी चुकीच्या पद्धतीने आले तरी रांग लागायला वेळ लागत नाही. गेल्या काही दिवसांपासून शहरात विविध



भागात सिग्नल यंत्रणा कोलमडलेली दिसते. यामध्ये सुधारणा आवश्यक आहे. त्याशिवाय रहदारी सुरळीत होणार नाही. याकडे लक्ष देणे आवश्यक झाले आहे. तसेच नियम तोडून जे वाहन चालक शेखी मिरवतात त्यांना कायद्याचा हिसका दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा गैरप्रकाराला आळा बसणार नाही. नाही तर एखाद्या दिवशी मोठी दुर्घटना देखील घडू शकते.

# पुंडा गावात तलाठी कार्यालयाचे बांधकाम उठले मुक्या जनावरांच्या जीवावर

प्रतिनिधी १६ मार्च

♦ ठेकेदाराचा व बांधकाम विभागाचा निष्काळजीपणामुळे वासरू पडले खोल खड्डयात

**अकोट :** पुंडा येथील तलाठी कार्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, या बांधकामाच्या ठिकाणी संबंधित ठेकेदाराने दाखवलेल्या कमालीच्या निष्काळजीपणामुळे एका गायीचे वासरू खोल खड्डयात पडल्याची धक्कादायक घटना काल घडली. सुदैवाने, स्थानिकांच्या प्रसंगावधानामुळे वासराला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले असले, तरी या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तलाठी कार्यालयाच्या आवारात पायाभरणीसाठी मोठे आणि खोल खड्डे खोदण्यात आले आहेत. नियमानुसार अशा धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स किंवा संरक्षक कुंपण लावणे आवश्यक असते. मात्र, ठेकेदाराने कोणतीही सुरक्षा यंत्रणा न लावल्याने चरण्यासाठी आलेले एक वासरू अचानक या खड्डयात कोसळले. वासराचा ओरडण्याचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक तात्काळ धावून आले. अथक प्रयत्नांनंतर सुटका खड्डा खोल असल्यामुळे वासराला स्वतःहून बाहेर येणे कठीण झाले होते. स्थानिक तरुणांनी आणि काही सामाजिक कार्यकर्त्यांनी तातडीने दोरखंडाच्या साहाय्याने बचावकार्य सुरू केले.



◆सरकारी कार्यालयाच्या बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात आहेत 'हा केवळ एका प्राण्याचा प्रश्न नाही, तर उद्या एखादे लहान मूलही या खड्डयात पडू शकले असते. ठेकेदाराच्या आणि अधिकारी यांचा बेजबाबदार वागण्यावर प्रशासनाने कठोर कारवाई करावी,
**नरेश पुंडकर**, ग्रामपंचायत सदस्य, पुंडा

◆मी घरात काम करत असताना वासराच्या ओरडण्याचा आवाज आल्यामुळे मी तिथे धावत गेली आणि लोकांना बोलविले बांधकाम सुरू असताना इथे कोणतीही संरक्षक कुंपण लावलेले नाही या कडे प्रशासनाने त्वरित लक्ष देऊन ठेकेदार आणि संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करावी.
**संगीता खंडारे,** समाजसेविका पुंडा

# एपस्टीन फाइल्स मध्ये नाव आल्याने मोदी यांनी तात्काळ राजीनामा द्यावा – काँग्रेस पक्ष

प्रतिनिधी १६ मार्च

**अकोला :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव एपस्टीन फाइल्स मध्ये आल्याने त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेस पक्षातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने देऊन करण्यात आली. या तीव आंदोलन आणि निदर्शनाचे नेतृत्व माजी महापौर निखिलेश दिवेकर यांनी केले. जेफरी ऐपस्टीन नावाच्या व्यक्तीने अमेरिकेत अनेक अल्पवयीन मुलींचे शोषण करून त्यांना देह व्यापार करायला भाग पाडले. एपस्टीन यांचे अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प समवेत जगातील मोठे राजकारणी, उद्योगपती, अभिनेते इत्यादी लोकांशी संबंध असल्याचे समोर आले आहे. यात भारतातील पंतप्रधान नरेंद्र मोदी, पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी व उद्योगपती अनिल अंबानी यांची नावे समोर आली आहेत. नुकतेच ट्रम्प यांनी, 'मी नरेंद्र मोदी यांची राजकीय कारकीर्द संपवू शकतो', असे एका मुलाखतीत म्हटले आहे. या सर्व घटनांवरून असे दिसते की मोदी यांनी कोणत्या दबावाखाली येऊन अमेरिकेशी कृषी व्यापार करार केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे जसे कापूस, फळे, भाज्या, सोयाबीन तेल इत्यादी. हे स्वस्त दरात भारतात येतील. यासोबतच भीतीमुळे मोदी असे अनेक व्यापारी करार करतील व भारताची हानी होईल. तरी मोदीजी यांनी तात्काळ राजीनामा द्यावा व नवीन व्यापार करार करणे टाळावे असे काँग्रेस तर्फे निदर्शने करण्यात आली.आजचे काँग्रेसचे निदर्शने




माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर यांच्या नेतृत्वात आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये शहराध्यक्ष डॉ प्रशांत वानखडे, डॉ सुधीर ढोणे, सरदार खान, मनीष मिश्रा, प्रशांत गावंडे, सौरभ चौधरी, विनोद मराठे, राजेश पाटील, पद्माकर वासनिक, सुनील चंदनबटवे, रहमान बाबू, भीमराव खंडारे, बब्बू भाई, राजकुमार परदेशी, जे के राजा, प्रशांत कौशल, दत्ता आमले, जितू वानखडे, विशाल इंगळे, महादेव मेहंगे, दीपक ठाकूर, विठ्ठल नाकट, चंद्रशेखर वाघाडे, नितीन पवार, कुंजन शिंदे, निलेश दुधगम, मिलिंद बागडे, व कम्युनिस्ट पक्षाच्या महिला देखील उपस्थित होत्या.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK